2.3.1

Learning at the college has always been student centric. The students participate in various academic and co-curricular activities within and outside the college in online mode, to the extent possible.

Students are given individual projects and class assignments, focusing on self-study and independent learning.

They are also assigned group projects and activities which promote pair and peer learning and team building.

During online classes, Classroom discussions conducted along with participative learning.

We motivated students to solve covid-19 related issues in their family and neighbourhood.

The Departments persuaded to participate in online competitions, workshops, conferences, seminars, webinars and quizzes. We ensured that students should gain knowledge and develop new skills, even during the lockdowns.

We have developed support system for the students and teachers that expand the learning environment thought online access to library.

The faculty exercised online teaching mode for their classrooms. They encouraged students to participate in online classes in spite of network issues due to hilly and coastal region and lack of proper gadgets and equipment.

College Youtube Channel Link :-

https://www.youtube.com/channel/UCM4ulNKo4YRfLBZvkQ-OMMw/videos

College Facebook page Link :-

https://www.facebook.com/groups/1179959275468723/?ref=share

Teacher Youtube Channel Link :-

https://studio.youtube.com/channel/UCPdjH0Kmu8vN5TH__Rq27Og

https://www.youtube.com/channel/UCGkIzOApSONjgsowlH_jH1g

https://youtube.com/channel/UCn_uKAJ2QdhzmZoQRHvaYyA

College Whatsapp Group Links :-

https://chat.whatsapp.com/HRk9FAFx3byKYm0ChvoFFf
https://chat.whatsapp.com/Ck3w9yFMnXpIk6oynW84gk
https://chat.whatsapp.com/F6OJXqFcfbuGVdI8IFqCtu
https://chat.whatsapp.com/F6FI8JDKot88RLN4SWmcva
https://chat.whatsapp.com/BcQIsJMSN9l3Ws7AfF1JMZ
https://chat.whatsapp.com/Bn094XbGMyBEexMBDEJKRD
https://chat.whatsapp.com/JMj1tVFEl8n9nR54G195nJ
https://chat.whatsapp.com/DZs5v1j0oI85U9yA0SMFNQ

Page No.
Date

भारतातील माजवी हक्क

2020-21

वैयक्तिक माहिती

Date :

नाव : विजय गणेश चव्हाण

कॉलेजचे नाव स.का.पाटील महाविद्यालय मालवण

इयत्ता : FYBSC [science]

हजेरी क्र : ०९

विषय : FOUNDATION COURSE

प्रकल्पाचे नाव : भारतातील मानवी हक्क

मार्गदर्शक शिक्षक : श्री नाईक सर

SAMRAT
Where Quality Rules

अनुक्रमणिका

अ.क	मुद्दे	पृष्ठक्रमांक	सही	गुण
१.	प्रस्तावना	१-२		
२.	विषय विवेचन	३		
३.	भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क	४		
४	सर्वसाधारण हक्क	५		
५	समानतेचा हक्क	५		
	१) कायद्यापुढे समानता	५		
	२) सार्वजनिक सेवायोजनेच्या बाबीमध्ये समान संधी	५		
	३) अस्पृश्यता नष्ट करणे	६		
६	स्वातंत्र्याचा हक्क	६		
७	शोषणाविरुद्धचा हक्क	७		
८.	धर्मस्वातंत्र्याचा हक्क	७		
९.	सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क	७-८		
१०	सार्वभौमत्व	९		
११	समाजवादी	१०		
१२	धर्मनिरपेक्ष	११		
१३	लोकशाही	१२		
१४	न्याय	१३		
१५	स्वातंत्र्य	१४		
१६	समानता	१५		
१७	बंधुता	१६		
१८	ऐक्य आणि अखंडता	१७		

Date :

१९	भारतातील हक्क अमल-बजावणी यंत्रणा.	१८
२०	राष्ट्रीय महिला आयोग	१९-२०
२१	राष्ट्रीय महिला आयोगाची कामे	२१-२२
२२	तक्रार व समुपदेशन केंद्र	२३
२३	महाराष्ट्र राज्य महिला आयोग	२४
२४	महिलांसाठी विशेष न्यायालये.	२५
२५	महिलांसाठी कौटुंबिक न्यायालये.	२५-२६
२६	महाराष्ट्र शासनाचे महिला-विषयक धोरण.	२६
२७	राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोग	२७
२८	राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोगाची कार्ये.	२८-२९
२९	राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग	३०
३०	राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची रचना कार्ये व अधिकार	३०-३१
३१	राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग	३२-३३
३२	रचना किंवा स्वरूप	३४-३५
३३	कार्ये	३६
३४	निष्कर्ष	३७-३८

Date :

प्रस्तावना

प्रस्तुत प्रकल्पामध्ये प्रामुख्याने भारतीय राज्यघटना व घटनेने प्राप्त करून दिलेले मुलभूत मानवी हक्क, भारतीय घटनेने मानवी हक्क अंबलबजावणीसाठी निर्माण केलेल्या यंत्रणा व मानवी हक्क मिळवून देण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची (Non-Government Organization) भूमिका या मुद्द्यानंतर भर टाकणार आहोत. अशा प्रकारे मानवी हक्कांचे संरक्षण करत असताना हक्कांची पायमल्ली होते का ? यावरदेखील प्रकाश टाकणार आहोत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्कांचा सार्वभौमिक जाहिरनामा १० डिसेंबर १९४८ साली जाहीर झाला. त्यापूर्वी सुमारे १७ महिने अगोदर भारत स्वतंत्र झाला, त्यानंतर भारताची राज्यघटना तयार करण्यासाठी घटना समिती निर्माण झाली. भारताची राज्यघटना २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तयार केली गेली, त्यानुसार २६ जानेवारी १९५० रोजी संविधानावर आधारित असे, भारत एक स्वतंत्र व सार्वभौम प्रजासत्ताक गणराज्य म्हणून अस्तित्वात आले. भारतीय राज्यघटना मंजूर होण्यापूर्वी संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्कांचा सार्वभौमिक जाहिरनामा जाहीर झाल्यामुळे त्या जाहिरनाम्याचे

SAMRAT

Date :

प्रतिबिंब भारतीय राज्यघटनेत उमटणे अपरिहार्य होते. भारतीय समाजरचनेचा विचार करता, भारतीय समाज रचना ही विषमतेवर आधारलेली असून जातीव्यवस्था हे या विषमतेचे प्रतिक होय. भारतातील विषमता ही इतर देशांच्या तुलनेत कर्तव्या-पेक्षा जन्मावर आधारलेली असते. भारतातील जातीवर आधारित विषमता समानतेच्या हक्कातील फार मोठा अडथळा आहे आणि हाच अडथळा आधुनिकीकरणाच्या व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील महासत्ताक बनू पाहणाऱ्या भारतासाठी अडचणीचा बनून राहिला आहे.

Date :

विषय विवेचन

लोकशाही देशामध्ये प्रत्येक व्यक्तीला राज्य-घटनेने अधिकार, हक्क मिळवून दिलेले आहेत. भारतीय राज्यघटनेमध्ये मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी अनेक प्रयत्न केलेले आहेत. मानवी हक्कांच्या अमलबजावणीसाठी राज्य घटनेच्या मार्गदर्शनानुसार वेगवेगळ्या प्रकारची यंत्रणासुद्धा राबवण्यात आलेली आहे. तसेच राज्यघटनेसोबतच स्वयंसेवी संस्थासुद्धा (Non-Government Organization) मानवी हक्क सुरक्षित व त्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होण्यासाठी सतत प्रयत्नशील असताना दिसतात.

SAMRAT

Date :

भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क

भारतीय राज्यघटनेचा सरकारनामा हा अमेरिकेच्या राज्यघटनेवरून घेतला आहे. जिथे लोक सर्वश्रेष्ठ असून सरकार हे प्रतिनिधीक आणि लोकांना जबाबदार असणारे सरकार असते. अशी समाजव्यवस्था हे राज्यघटनेच्या सरकारनामा हा राज्यघटनेचा सरनामा हा राज्यघटनेचे मुलभूत तत्वज्ञान आणि राज्य-घटनेच्या कर्त्यांची मते जाणून घेण्याची गुरू-किल्ली मानली गेली आहे. जरी सरनाम्याच्या अमलबजावणीसाठी न्यायालयामध्ये दाद मागता येत नसले तरी लिखित राज्यघटनेसाठी सर-नाम्यामुळे तीन महत्वाच्या हेतूसाठी उपयोगी पडते. भारत हा देश सार्वभौम, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य असल्याचे जाहीर झाले आहे. परंतु ही उद्दिष्ट्ये, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, ऐक्य आणि अखंडता या मूल्यासह साध्य करावयाची आहे.

SAMRAT

Date :

सर्वसाधारण हक्क

राज्य या शब्दात भारताचे सरकार व संसद आणि राज्यांची प्रत्येक राज्यांचे शासन, विधानमंडळ आणि भारताच्या राज्यक्षेत्रातील सर्व स्थानिक किंवा प्राधिकरणे यांचा समावेश आहे.

समानतेचा हक्क

कायद्यापुढे समानता - राज्य कोणत्याही व्यक्तिस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता किंवा कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही. राज्य कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यांपैकी कोणत्याही नागरिकाला कारणावरून भेदभाव करणार नाही. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे आणि सार्वजनिक करमणुकीची ठिकाणे येथे प्रवेश देण्यात येईल.

सार्वजनिक सेवायोजनेच्या बाबीमध्ये समान संधी - राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावरील नियुक्तीसंबंधीच्या बाबीमध्ये सर्व नागरिकास समान संधी मिळेल. कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान, निवास यांपैकी कोणत्याही

SAMRAT Where Quality Rules

Date :

कारणावरून राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतेही पद यांच्याकरता अपात्र असणार नाही अथवा भेदभाव केला जाणार नाही.

अस्पृश्यता नष्ट करणे. घटनेच्या निर्मितीपासून अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे. व तिचे कोणत्याही स्वरूपातील आचरण निषिद्ध करण्यात आले आहे. अस्पृश्यतेच्या भेदभावातून कोणतीही निःसमर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

स्वातंत्र्याचा हक्क

भारतामध्ये वास्तव्य असणाऱ्या सर्व नागरिकांस स्वातंत्र्याचा हक्क भारतीय राज्यघटनेने प्रदान केले आहे, त्यामध्ये भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याचा हक्क, शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचा हक्क, संघ बनवण्याचा हक्क, सर्वत्र देशभर मुक्तपणे संचार करण्याचा हक्क, राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागात राहण्याचे व स्थायिक होण्याचा हक्क, मालमत्ता संपादन करण्याचा हक्क, कोणताही पेशा आचारण्याचा अथवा कोणताही व्यवसाय, व्यापार आणि धंदा चालवण्याचा हक्क असे अनेक प्रकारचे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. थोडक्यात. भारतीय नागरिकास कोणत्याही बंधनामध्ये न ठेवता मुक्तपणे राहण्याचा हक्क मिळवून दिला.

SAMRAT

Date :

शोषणाविरुद्ध हक्क

माणसाचा अपव्यापार आणि वेठबिगारी यासारख्या अन्य स्वरूपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे आणि या तरतुदीचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

कलम २४ अन्वये- चौदा वर्षाखालील कोणत्याही बालकास, कोणत्याही कारखान्यात वा खाणीत काम करण्यासाठी नोकरीस ठेवले जाणार नाही अथवा अन्य कोणत्याही धोक्याच्या कामावर लावले जाणार नाही.

धर्मस्वातंत्र्याचा हक्क

सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य यांच्या या भागातील अन्य तरतुदींच्या अधिनतेने सदसद्विवेकबुद्धीच्या स्वातंत्र्याला आणि धर्म मुक्तपणे प्रकट करण्याच्या, आचरण्याच्या व त्याचा प्रचार करण्याच्या अधिकारासाठी सर्व व्यक्ति सारख्याच आहेत अशा प्रकारच्या तरतुदी भारतीय राज्यघटनेच्या कलम २५ (१) मध्ये मांडण्यात आल्या आहेत.

सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क

SAMRAT
Where Quality Rules

Date :

भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या, कोणत्याही नागरिकाला वाटाला आपली स्वतःची वेगळी भाषा लिपी व संस्कृती असेल त्याला जतन करण्याचा हक्क असेल.

राज्याकडून चालविल्या जाणाऱ्या किंवा राज्यनिधीतून साहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकाला केवळ धर्म, वंश, जात यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

राज्य घटनेचा सरनामा हा राज्यघटनेच्या मुलभूत तत्वज्ञान आणि राज्यघटनेच्या कर्त्यांची मने जाणून घेण्याची गुरूकिल्ली मानली गेली आहे. सरनामा स्पष्टपणे अधिकाराचा स्रोत सांगतो तो म्हणजे भारतीय लोक सरनाम्याचे सुरूवातीचे शब्द 'आम्ही भारताचे लोक हे दर्शवितो की, भारताच्या सरकारचे अधिकार हे लोकांपासून प्राप्त होतात. भारताच्या सरकारास आणि राज्यांना जी ताकद दिली गेली आहे. ती कुणा विशिष्ट मंडळाने प्रदान केलेली नाही. तर भारतीय लोकांनी प्रदान केलेली आहे. सरनाम्यामध्ये लोकांच्या उत्कृष्ठ इच्छा आणि त्या उत्कष्ठ इच्छा ज्या आदर्शांच्यांद्वारे पूर्ण करावयाच्या आहेत, ते आदर्श समाविष्ट केलेले आहेत. भारत देश हा सार्वभौम धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य असल्याचे जाहीर झाले आहे.

SAMRAT
Where Quality Rules

Date :

सार्वभौमत्व

सार्वभौमत्व हा स्वतंत्र राज्याचा विशेष गुणधर्म आहे. ते राज्याला सर्वोच्च शक्ती असल्याचे दर्शविते. साध्या शब्दात सांगायचे तर देश त्याच्या मुलुखाबाहेरील कोणाचाही अधिकार मान्य करत नाही आणि मुलुखा-अंतर्गच ते सर्वोच्च असतात. परंतु, वर्तमान जगात सार्वभौमत्वार अनेक नैतिक आणि कायदेशीर निर्बंध असतात. त्यामुळे कोणताही देश पूर्णपणे सर्वोच्च नसतो. कलम ५१ वे असे सांगते की, सरकारने आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता वृद्धिंगत करावी. राष्ट्राराष्ट्रामध्ये न्यायाचे आणि आदराचे नाते राखावे. आंतरराष्ट्रीय कायदा आणि तह यांच्या-तील आदर बाळगावा आंतरराष्ट्रीय स्तरावरील तंटे मिटवण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. अशा रितीने राज्यघटनेच्या सार्वभौमत्वाच्या संकल्प-नेला कलम ५१ सह विचार केल्यास विश्व-शांतीचे संवर्धन करण्याचा संदेश ध्वनीत होतो. अशा रितीने मानवी हक्कांच्या संरक्ष-णासाठी अनेक प्रयत्न केले पाहिजेत. भारतीय सार्वभौमत्वाची संकल्पना 'एक विश्व' आंतरराष्ट्रीय शांतता आणि स्नेहभाव या संकल्पनाशी मिळतीजुळती आहे.

Date :

समाजवादी

भारतीय राज्यघटनेचा सरनामा राज्यघटनेच्या समाजवादी दृष्टिकोणावर भर देतो. समाजवाद म्हणजे ऑक्सफर्ड शब्दकोशामध्ये सांगितल्याप्रमाणे 'उत्पादन, भांडवल, जमीन, संपत्ती इत्यादी साधनांची मालकी आणि नियंत्रण हे पूर्णपणे समाजाकडे असावे आणि त्यांचा कारभार आणि वितरण सर्वांच्या हितासाठी व्हावे. या मताचे समर्थन करणारे सामाजिक संघटन असावे. लोकशाही असो किंवा साम्यवादी दोन्ही प्रकारच्या राज्यघटनांमध्ये ही संकल्पना वापरली गेली आहे. म्हणजेच उत्पादनाच्या साधनावर राज्याचे पूर्णपणे नियंत्रण असणारी शासनव्यवस्था होय. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, समाजवादाचा मूळ हेतू लोकांना सन्मानपूर्वक जीवन जगता येईल असे वातावरण उपलब्ध करून देणे.

SAMRAT

धर्मनिरपेक्ष

धर्मनिरपेक्ष हा राज्यघटनेचा मूलभूत गुणधर्म आहे. भारतीय राज्यघटनेच्या धर्मनिरपेक्ष स्वरूपावर भर देण्याच्या दृष्टिकोणातून १९७६ साली ४२ व्या घटना दुरुस्तीद्वारे राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये धर्मनिरपेक्ष हे विशेषण नव्याने घालण्यात आले. युरोपियन परंपरेनुसार धर्मनिरपेक्ष राज्य म्हणजे धर्मापासून राज्याची फारकत. तथापि, भारतीय वास्तवाच्या संदर्भातून त्याला दोन अर्थ आहेत. एक म्हणजे राज्य कोणत्याही धर्माचा अनुनय करत नाही, दुसरे म्हणजे राज्यासाठी सर्व धर्म समान आहेत.

सर्व धर्माविषयी राज्य वा शासन नेहमीच समानतेची भूमिका घेत असते. म्हणजेच सर्वांना कायद्यासमोर समान लेखणे व त्यांना संरक्षण पुरविणे. धर्म, वंश, जात लिंग वा जन्मस्थान यावरून भेदभाव केला जात नाही. धर्माच्या नावाखाली भेदभाव न करता समानसंधी दिली जाते. म्हणजे धार्मिक स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे.

Date :

लोकशाही

भारताच्या राज्यघटनेमध्ये लोकशाही ही संज्ञा मतदानाच्या हक्कापुरती मर्यादित न ठेवता बहुसमावेशक अर्थाने वापरली गेली आहे. भारतीय राज्यघटना अप्रत्यक्षक किंवा प्रातिनिधीक लोकशाहीचे समर्थन करते. त्यामध्ये ठराविक काळानंतर मुक्त आणि नि:पक्ष न्याय निवडणूकांची तरतूद आहे. धर्म, वंश, वर्ग, निवासाचे स्थान यासारख्या इतर कारणासाठी भेदभाव करण्यास राज्याना प्रतिबंध केलेला आहे. सरकार चालविण्याचे सर्वाधिकार लोकशाही पद्धतिने लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीच्या हातात असतात. लोकशाहीच्या संकल्पनेत राजकीय लोकशाहीबरोबर सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीदेखील अभिप्रेत आहे. म्हणून राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय, विचारांचे, अभिव्यक्तीचे, विश्वासाचे, श्रद्धेचे आणि उपासनेचे स्वातंत्र्य, दर्जाची समान जीवनमान संधी आणि बंधुता यावर भर दिला आहे. नागरिकांच्या निर्णायक सहभागाविना लोकशाही प्रत्यक्षात येणे अशक्य आहे. बलवान लोकशाही समाजव्यवस्था निर्माण होण्यासाठी नागरिकांचे नागरी शिक्षण, नेतृत्व, प्रशिक्षण आणि नैतिक मूल्ये बिंबवणे आवश्यक आहे.

Date :

न्याय

मानवी हक्कांच्या सर्व घेनूना न्यायाची संकल्पना व्यापून टाकते. राज्यघटनेचा सरनामा सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाचे आश्वासन देतो. मतदानाच्या हक्का-द्वारे राजकीय न्यायाची हमी मिळते. सामा-जिक आणि आर्थिक न्याय, हा राजकीय न्याय आणि नागरिकांमधील असमानता दूर करण्या-मध्ये राज्याची सकारात्मक भूमिका याद्वारे प्राप्त केला जातो. आर्थिक न्यायाच्या संकल्प-नेत रूढ समाजवादी समाजरचना आणि अस्पृश्यता, जातिव्यवस्था यासारख्या सामाजिक रूढींचे उच्चाटन अपेक्षित आहे. सामाजिक न्यायाच्या परिपूर्तीसाठी स्वातंत्र्याबरोबर सामा-जिक आणि आर्थिक समानतेची समज असणे गरजेचे आहे. राज्य घटनेचे शिल्पकार आणि घटनेचे संस्थापक जवाहरलाल नेहरू यांना स्पष्ट कल्पना होती की, आर्थिक न्यायाविना राजकीय न्याय मिळणे अर्थहीन आहे. धार्मिक, जाती आणि सांप्रदायिक भेदभावांचे प्राबल्य असलेल्या या समाजात सामाजिक न्यायाशी सांगड घातल्याशिवाय फक्त आर्थिक न्याय मिळणे पुरेसे नाही.

SAMRAT

Date :

स्वातंत्र्य

राज्य घटना सर्व नागरिकांना विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा आणि उपासना याचे स्वातंत्र्य असल्याचे आश्वासन देते. असे स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीच्या वर्तनावर जुलमी निर्बंधाचा अभाव असणे. ही लोकशाहीची महत्वाची अट आहे. भारतीय राज्यघटना सकारात्मक आणि व्यापक दृष्टिकोणातून स्वातंत्र्याला मान्यता देते. समाजातील इतरांच्या स्वातंत्र्याविषयी आदर बाळगत स्वतःचे स्वातंत्र्य उपभोगायचे असते. भारतीय राज्यघटना जनतेच्या मूलभूत अधिकाराच्या संरक्षणासाठी न्यायवानिका स्वतंत्र राहिल असे आश्वासन देते.

SAMRAT

Date

समानता

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे तिसरे वैशिष्ट्य म्हणजे नागरिकांना समान जीवनमान जगण्याची संधी देणे हे आहे. राज्यघटनेच्या कलम १४ ते १८ मध्ये समानतेची संकल्पना आढळते. व्यक्तीच्या समाजाच्या विकासासाठी समानता असणे फार आवश्यक आहे. भेदविरहित व्यक्तिमत्व विकासासाठी समानता असणे आवश्यक आहे. समानता म्हणजेच वंश, वर्ण, धर्म, जात, भाषा, लिंग, राजकीय मत किंवा दर्जा यावरून भेदभाव अस्तित्वात नसणे. कायद्यासमोर सर्वजण समान आहेत आणि सर्वांना कायद्याचे समान संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे.

SAMRAT

Date :

बंधुभाव

ब्रिटीश वसाहतीच्या काळातील अन्याय व अत्याचार सोसलेला असल्यामुळे राज्यघटनेचे कर्ते बंधुभावाच्या आदर्श किती महत्त्वाचा आहे, हे जाणून होते. त्यांनी ब्रिटीश सत्तेचा अनुभव घेतलेला होता. आणि देशाला फाळणीकडे नेणाऱ्या घटना जवळून पाहिलेल्या होत्या. त्यामुळे राज्यघटनेच्या कर्त्यांनी बंधुभावाचा आदर्श अंगीकारला. बंधुभाव म्हणजे परस्पर प्रेम की ज्यामुळे इतरांनी मला द्यावा साठी काय करावे असे वाटणे, तेच त्याने इतरांसाठी करावे किंवा तसे वागावे याकडे माणसाला कल असणे होय. जर भारत देशाला एक राष्ट्र म्हणून अस्तित्व टिकवायचे असेल तर बंधुभाव रुजविणे गरजेचे आहे.

Eco

SAMRAT

Date :

ऐक्य आणि अखंडता

भारतीय राज्यघटनेचा सरनामा ऐक्य आणि अखंडतेवर भर देतो. देशाच्या एकते-ला आणि अखंडतेला धोका पोहचविणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. देशाचे ऐक्य आणि अखंडता टिकवण्यासाठी सर्वोत्परी प्रयत्न केले पाहिजेत, त्याविना देशाची सामाजिक. आर्थिक. राजकीय, शैक्षणिक इ. प्रगती करणे शक्य नाही. जर देशामध्ये एकता व अखंडता टिकली तरच विकास शक्य आहे. भारतीय राज्यघटनेचा सरनामा हा महात्मा गांधी, नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्यासाठी सज्ज आहे, म्हणजेच असा भारत की जिथे गरिबातल्या गरीब माणसालासुद्धा हा देश त्याचा आहे याची जाणीव होते, असा भारत की जिथे सर्वजण गुण्यागोविंदाने राहतील.

Date :

भारतातील मानवी हक्क अंमल-बजावणी यंत्रणा

भारतीय राज्यघटनेने भारतातील प्रत्येक नागरिकास त्याचे हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला त्यानुसार प्रत्येक व्यक्ती आपले अधिकार व कर्तव्य यार पाडण्यास बांधिल आहे हे आपणा सर्वांना माहितच आहे. पण याबरोबरच एक प्रकारची यंत्रणा मानवी हक्क अंमलबजावणीसाठी सज्ज आहे. याचाही विसर आपणास पडता कामा नये, म्हणजेच यामुळे समाजातील उपेक्षित घटकांचे मानवी हक्क जपणाऱ्या वैधानिक यंत्रणाची माहिती असणे गरजेचे आहे. या मानवी हक्क अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा कोणत्या आहेत ? काय स्वरूपाच्या आहेत ? त्यांची उद्दिष्टये, कार्ये या सर्व गोष्टींची माहिती असणे एक अभ्यासक व नागरिक म्हणून महत्त्वाचे आहे.

Date :

राष्ट्रीय महिला आयो

भारतीय राज्यघटनेमध्ये भाग ३ व ४ मध्ये स्त्रियांच्या हक्काविषयी काही महत्त्वाच्या तरतुदी सांगितल्या आहेत. भारतातील स्त्रियांच्या विकासासाठी, सबलीकरणासाठी संस्थात्मक पाठबळाचा विकास करणे हा लिंगभाव समता प्रस्थापित करण्याचा अविभाज्य भाग होय. लिंगभाव न्यायतेची जाणीव आणि स्त्रियांच्या प्रगतीकरिता सक्षम भूमिका वटवण्याच्या उद्देशाने व वातावरण निर्मिती करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने दोन आयोग स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यातील पहिला आयोग आहे 'राष्ट्रीय महिला आयोग' (National commision for Woman) आणि दुसरा आयोग आहे 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोग' (National Human Right commision) राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना १९९२ साली झाली. तर राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना १९९३ साली झाली. भारत सरकारने राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना १९९२ साली केली. महिला अत्याचाराविरुद्धच्या कायद्याचे पुनर्मूल्यांकन करून विशिष्ट वैयक्तिक तक्रारीमध्ये हस्तक्षेप करणे हे महिला आयोगाचे कार्य मानले जाते. तसेच स्त्रियांमध्ये कायदेविषयक जाणीव जागृती निर्माण

SAMRAT

Date :

करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन या आयोगामार्फत केले जाते. त्याचसोबत 'कौटुंबिक महिला लोक अदालतीचे' आयोजन या आयोगामार्फत केले जाते आणि त्यात कौटुंबिक तक्रारीबाबत समुपदेशन केले जाते. स्त्रियांचे अधिकार त्यांची वंचितता या संबंधातील तक्रारीचे परीक्षण करताना कायद्यामध्ये तरतूद केलेल्या सुरक्षा कवचाचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास, त्यासंदर्भात आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार मिळतात. त्याचप्रमाणे एखाद्या दस्तऐवजाची आणि प्रतिज्ञापत्राची मागणी आयोगाला संबंधितांकडे करता येते. स्त्रियांच्या संदर्भातील सर्व प्रश्नांच्या बाबतीत भारत सरकारला राष्ट्रीय महिला आयोगाशी सल्लामसलत करणे बंधनकारक असते. राष्ट्रीय महिला आयोगाप्रमाणे प्रत्येक प्रांत सरकारने त्याच्या त्याच्या प्रांतात (State Government) स्वतंत्र्य महिला आयोग स्थापन करण्याचा सल्ला केंद्र सरकारने सर्व प्रांतिक सरकारना दिला आहे. एकूणच उपलब्ध माहितीनुसार २००२ पर्यंत भारतातील केवळ १३ राज्यांमध्ये स्वतंत्र राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

SAMRAT
Where Quality Rules

Date :

राष्ट्रीय महिला आयोगाची कार्ये

(Functions of the National Commision for Women)

१९९२ साली राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना झाल्यानंतर भारत सरकारने 'राष्ट्रीय महिला आयोगाने पुढील कार्ये चार वाडावीत असा सल्ला आयोगाला दिला होता. ही कार्ये पुढीलप्रमाणे :-

१) संविधान आणि इतर कायद्यामध्ये स्त्रियांसाठी केलेल्या इतर सुरक्षा संदर्भातील बाबींचा शोध घेवून त्याचे परीक्षण करण्याचे कार्य आयोगाचे आहे.

२) स्त्रियासंबंधीच्या सुरक्षा कवचाची परिणामकारक अंमलबजावणी करून स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक त्या योग्य शिफारशी करणे.

३) स्त्रियांना प्रतिनिधीत्व सर्व क्षेत्रात वाढवण्यासाठी योग्य मार्ग सुचविणारे सूचनात्मक आणि शैक्षणिक संशोधन करणे की, ज्यामुळे स्त्रियांच्या प्रगतीत अडथळा आणणारे घटक ओळखण्याचे कार्यही आयोगाला करावे लागते.

४) स्त्रियांना त्याच्या अधिकारापासून वंचित ठेवणे, कायद्याची अंमलबजावणी न करणे, धोरणात्मक निर्णयांना संमती न देणे याबाबतच्या तक्रारींची स्वतः हून दखल घेण्याचे कार्य आयोगाचे आहे.

५) साधारणपणे स्त्रियानंतर अन्याय होईल

SAMRAT

Date :

अशा घटनेच्या विरोधातील खटले चालविण्यासाठी आवश्यक तेवढ्या निधी संबंधितांना उपलब्ध करून देण्याचेही कार्य आयोगाला करावे लागते.

६) तुरुंग, सुधारगृह, स्त्रियांच्या संस्था किंवा इतर जागा की जिथे स्त्रियांना बंदिस्त करून ठेवले जाते. अशा ठिकाणचे परीक्षण करणे आणि अत्यावश्यक असेल तर संबंधित अधिकाऱ्याबरोबर उपाययोजनात्मक कृती करण्यास सांगण्याचे कार्य महिला आयोगाला पार पाडावे लागते.

SAMRAT

Date :

तक्रार व समुपदेशन केंद्र

राष्ट्रीय महिला आयोग कायदा कलम ७० अंतर्गत तक्रार व समुपदेशन हा महिला आयोगाचा गाभा असून तेथे लेखी, मौखिक, किंवा स्वयंप्रेरणेने पुढाकार घेवून तक्रारीची दखल घेतली जाते. या तक्रारी कौटुंबिक छळ, हुंड्यासाठी छळ, अत्याचार, बलात्कार, दुहेरी-संबंध ठेवणे, परित्याग, नवऱ्याकडून अमानुष वागणूक, सापत्नभाव व कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ अशा प्रकारच्या असतात. या तक्रारींचे निवारण खालील पद्धतीने केले जाते.

१) पोलिसांच्या तपासावर नियंत्रण व सुसूत्रता आणणे

२) कौटुंबिक समस्यांचे समुपदेशनाद्वारे करणे.

३) गंभीर गुन्ह्याबाबत चौकशी समिती नेमून चौकशी करणे, साक्षी पुरावे मिळविणे व शिक्षेशी देऊन अहवाल तयार करणे, तसेच अहवालाच्या अंमलबजावणीसाठी सतर्क राहणे.

४) या प्रयत्नामध्ये राज्य आयोग, स्वयंसेवी संस्था व इतर तज्ञही सहभागी असतात.

Date :

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

महाराष्ट्र राज्य महिला आयोग कायदा, १९९३ अंतर्गत महाराष्ट्र राज्य महिला आयोगही एक कायदेशीर यंत्रणा आहे. आयोगाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे:

१) समाजामध्ये स्त्रियांचा दर्जा सुधारणे.
२) स्त्रियांना मिळणारी मानहानीची वागणूक थांबवणे.
३) स्त्रियांसाठी असणाऱ्या कायद्यांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे
४) स्त्रियांचा संदर्भात दर्जा सुधारण्यासाठी आणि आत्मसन्मान राखण्यासाठी शासनाला मार्गदर्शन करणे.

स्त्रियांच्या संदर्भात होणाऱ्या तक्रारींची दखल घेऊन आयोग पोलीस, संबंधित अधिकारी किंवा शासन यांना त्वरित कारवाई करावयास भाग पडणे. स्त्रियांच्या अत्याचारांच्या प्रकरणामध्ये आयोग कोणतीही कारवाई सुरू करण्यापूर्वी गरजू महिलांचे समुपदेशन करते. त्याकरिता आयोगाच्या मुंबईच्या कार्यालयामध्ये १९९५ पासून समुपदेशन व मोफत कायदा, सल्ला केंद्र सुरू केले आहे. आयोगाने सर्व जिल्हा परिषद, नगरपालिका व स्थानिक यंत्रणा, महिला व बालविकास खात्याकडून मिळणाऱ्या

SAMRAT

Date :

आर्थिक साहाय्याने समुपदेशन केंद्र सुरू करण्यास सांगितले आहे. महिलामध्ये कायदेविषयक साक्षरता निर्माण करण्यासाठी आयोग स्वयंसेवी संस्थांबरोबर शिबीरे आयोजित करते. आयोग काही विशिष्ट मुद्द्यांबाबत सतर्क असते, जसे गर्भ लिंग तपासणी (गैरवापराचे नियमन व प्रतिबंध) कायदा, १९९४ आणि प्रसार माध्यमातील स्त्रियांच्या सादरीकरणाबाबत असंवेदनशीलता इत्यादीबाबत.

महिलांचे हक्काच्या संरक्षण व संवर्धन यासाठी राज्याने काही तरतुदी सुचविल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे :-

महिलांसाठी विशेष न्यायालये

महाराष्ट्रामध्ये महिलांसाठी विशेष न्यायालये अहमदनगर, औरंगाबाद, अकोला, अमरावती, बुलढाणा, बीड, जळगांव, नागपूर, ठाणे, यवतमाळ, पुणे, कोल्हापूर, मुंबई येथे स्थापन झाली आहेत. या न्यायालयामध्ये भारतीय दंड संहिता कलम ४९८ (अ), ३०६ (ब), ३७५ व महिलांवरील अत्याचारविषयक इतर तक्रारी दाखल केल्या जातात.

महिलांसाठी कौटुंबिक न्यायालये

कौटुंबिक न्यायालये कायदा १९८४ अंतर्गत भारतात कौटुंबिक न्यायालये स्थापन झाली.

SAMRAT

Date :

महाराष्ट्रातील पहिले महिला कौटुंबिक न्यायालय १९८८ साली पुणे येथे स्थापन झाले. आज महाराष्ट्रात १६ कौटुंबिक न्यायालये आहेत या न्यायालयामध्ये कौटुंबिक मतभेद, वैवाहिक समस्या यांचे जलद व यशस्वी निवारण केले जाते. १० लाखाच्यावर लोकसंख्या असलेल्या प्रत्येक शहरात असे न्यायालय असणे गरजेचे आहे. या न्यायालयामध्ये अनेक प्रकारचे वैवाहिक मुद्दे हाताळले जातात. उदा. घटस्फोट, विवाह रद्द करणे. पत्नी-पती दोघांची किंवा कोणा एकाची मानसिकता, व्यक्तिचे कायदेशीर असण्याबाबत घोषणापत्र, एखाद्या व्यक्तीचे पालकत्व किंवा सज्ञान नसलेल्या मुलाचा हक्क, फौजदारी दाव्याचा भाग व अंतर्गत पोटगी.

महाराष्ट्र शासनाचे महिलाविषयक धोरण

'महिला व बालविकास' या स्वतंत्र खात्याची स्थापना राज्यात जून १९९३ साली करण्यात आली राज्याची महिलाविषयक धोरणे या खात्यामध्ये जातात. महिलासाठी एका व्यापक धोरणाची आखणी १९९४ साली केली गेली व त्याची अंमलबजावणीदेखील करण्यात येत आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये महिलांचे प्रतिनिधीत्व वाढावे ही यामागची भावना आहे.

Eco

SAMRAT

Date :

राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोग

अनुसूचित जाती आणि जमातीचे होणारे शोषण रोखण्यासाठी तसेच त्यांना सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी भारतीय राज्यघटनेने काही धोरणे राबविली आहेत. या धोरणांची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होण्यासाठी घटनेतील कलम ३३८ अंतर्गत एका विशेष अधिकाऱ्याच्या नियुक्तीची तरतूद सांगितली आहे. पण भारत सरकारने १९७८ साली यामध्ये बदल करून 'अनुसूचित जाती व जमाती आयोग' हे नाव बदलून 'राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती' असे नाव देण्यात आले. सामाजिकदृष्ट्या दबल्या गेलेल्या अनुसूचित जाती व जमातीच्या विकासासाठी केलेल्या विविध धोरणाबाबत सरकारला सल्ला देणारी राष्ट्रीय सल्ला समिती हे आयोगाचे उद्दिष्ट आहे.

१९९० मध्ये ६५ व्या घटना दुरुस्तीद्वारे राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोग कायदा अस्तित्वात आला आणि त्यानंतर २००३ मध्ये ८९ व्या घटना दुरुस्तीनंतर 'राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग' व राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग' असे दोन भाग करण्यात आले.

Date :

राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोग

संविधानात नमूद केलेल्या तरतुदीनुसार या आयोगाने खालील कर्तव्ये पालन करणे बंधनकारक आहे.

१) अनुसूचित जाती व जमाती यासाठी या संविधानाखाली किंवा शासनाच्या कोणत्याही आदेशाखाली तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाय योजनासंबंधिच्या सर्व बाबींचे नियंत्रण करणे व त्याचे मूल्यमापन करणे आयोगाच्या कर्तव्यात येते.

२) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना त्यांच्या हक्कापासून आणि संरक्षक उपाययोजनांपासून वंचित केल्यासंबंधीच्या तक्रारीची चौकशी करणे.

३) अनुसूचित जाती व जमाती यांच्या सामाजिक आर्थिक विकासाच्या नियोजन प्रक्रियेमध्ये सहभागी होणे व सल्ला देणे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील त्यांच्या विकासाचे मूल्यमापन करणे.

४) त्या संरक्षण उपाययोजनेच्या कार्यवाही-वरील अहवाल दरवर्षी व आयोगाला योग्य वाटेल अशावेळी राष्ट्रपतीला सादर करणे.

५) अशा प्रकारच्या अहवालामध्ये, राज्याने त्या संरक्षक उपाययोजनांची प्रभावी अशी

SAMRAT
Where Quality Rules

Date

अंमलबजावणी करण्याकरिता योजण्याचे उपाय आणि अनुसूचित जाती व जमातींचे संरक्षण, कल्याण, सामाजिक व आर्थिक विकास याकरिता करावयाचे इतर उपाय आणि अनुसूचित याबाबत शिफारशी करणे.

५) अनुसूचित जाती व जमाती यांचे संरक्षण कल्याण, विकास आणि अभिवृद्धी यासंबंधात संसदेने केलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना अधीन राहून, राष्ट्रपती नियमाद्वारे विनिर्दिष्ट करतील, अशी कर्तव्ये पार पाडणे.

SAMRAT
Where Quality Rules

Date :

राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग

इंदिरा साहनी विरुद्ध भारत सरकार, १९९२ या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाला अनुसरून भारत सरकारने राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग कायदा, १९९३ साली अधिनियमित केला. या बरोबरच केंद्र पातळीवर राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची स्थापना केली. या कायद्याद्वारे आयोगाची स्थापना करून सामाजिक आणि शैक्षणिक-दृष्ट्या मागासवर्गीयांची परिस्थिती व त्यांना येणाऱ्या अडचणींची पाहणी करून त्यावर उपाय सुचविण्याची तरतूद आहे.

राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची रचना कार्ये व अधिकार

भारत सरकारने ऑगस्ट १९९३ मध्ये तीन वर्षांच्या कालावधीसाठी आयोगाची स्थापना केली होती, ज्याला पुढे मुदतवाढ देण्यात आली होती.

कार्ये

केंद्रीय मागासवर्गीय यादीमध्ये नागरिकांच्या

SAMRAT Where Quality Rules

Date :

कोणत्याही गटाचा अंतर्भाव करण्याच्या विनंतीची तपासणी करणे आणि एखाद्या गटाचा जास्त किंवा कमी प्रमाणात अंतर्भाव झाल्याच्या तक्रारीची दखल घेणे ही आयोगाची कार्ये आहेत. यावरील आयोगाच्या सूचना केंद्रशासनाला बंधनकारक असतात. कायदा अस्तित्वात आल्यापासून कोणत्याहीवेळी किंवा दहा वर्षे होवून गेल्यावर आणि त्यानंतर दर दहा वर्षांनी ही यादी तपासून त्यातील जे वर्ग मागासलेले राहिलेले नाहीत अशांची नावे कमी करून नवीन वर्गाचा अंतर्भाव करण्याचा अधिकार केंद्र शासनाला आहे. मात्र वरील प्रकारचे कोणतेही फेरबदल करताना केंद्र शासनाने आयोगाचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

अधिकार

आयोगाने ठरविलेल्या पद्धतीनुसार केंद्रशासनाच्या यादीत मागासवर्गीयांना अंतर्भाव अतिरिक्त अंतर्भाव किंवा कमी प्रमाणातील अंतर्भाव याबाबतच्या तक्रारींचे निवारण केले जाते. या तक्रारी एक व्यक्ती, संस्था किंवा संघटना, राज्य शासन किंवा केंद्रशासित प्रदेश यांना करता येतात. आयोगाला मिळालेल्या माहितीच्या आधारे आयोग प्रत्येक जात, पोट जात, समाजाबाबतच्या याचिका तक्रारीचा अभ्यास करते.

SAMPAT

Date :

राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग

राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग तसे पाहता पाहता अल्पसंख्यांक ही संकल्पना सापेक्ष आहे. स्थळ, काळ परिस्थितीनुसार अल्पसंख्यांक गटाचे स्वरूप वेगळे असते. नागरी आणि राजकीय हक्कांच्या आंतरराष्ट्रीय करारान्वये कलम २७ नुसार फक्त तीन प्रकारच्या अल्पसंख्यांक गटांचा उल्लेख जागतिक पातळीवर करण्यात आला आहे.

अ) वांशिक अल्पसंख्यांक (Ethnic Minorities)
ब) धार्मिक अल्पसंख्यांक (Religious Minorities)
क) भाषिक अल्पसंख्यांक (Lingustic Minorities)

या करारानुसार अल्पसंख्यांकाचे हे तीन गट जागतिक पातळीवर अस्तित्वात असले तरी राष्ट्रीय पातळीवर अल्पसंख्यांकांचे मात्र तीन पेक्षा जास्त गट पडू शकतात. युरोप परिषदेच्या संसदीय विधीमंडळाने राष्ट्रीय अल्पसंख्यांकाचे पाच गटात विभाजन केले आहे.

अ) राज्याच्या भूभागावर राहणारे आणि त्या राज्याचे नागरिकत्व स्विकारलेले परदेशीय राज्याचे लोक वा नागरिक उदा. अमेरिकेत किंवा इंग्लंडमध्ये कायमचे स्थायिक होवून त्या देशाचे नागरिकत्व स्विकारलेले भारतीय.

Date :

ब) परकीय राज्यात प्रदीर्घ कालावधीपासून चालत आलेला व्यवसाय, कारखाना व त्या राज्याशी संबंध प्रस्थापित केलेले परकीय नागरिक.

क) स्वतःचे वेगळे वांशिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि भाषिक गुणवैशिष्ट्ये परक्या देशात टिकवून ठेवणारा लोकांचा गट.

ड) राज्याच्या किंवा प्रांतांच्या एकूण लोकसंख्येत स्वतःचे वेगळेपण टिकवणाऱ्या लोकांचा प्रातिनिधिक गट

इ) परक्या देशात आपली स्वतःची वेगळी अस्मिता जतन करणाऱ्या, स्वतःची संस्कृती, परंपरा, भाषा आणि धर्म जपणाऱ्या लोकांचा गट

वर नमूद केलेल्या गोष्टींचा अर्थ असा होतो की, परक्या देशात, आपले, आपल्या गटाचे विविध प्रकारचे वेगळेपण टिकवणारे गट हे 'अल्पसंख्याक गट' या संज्ञेला पात्र ठरतात व त्या देशात या परकीय नागरिकांच्या विविध हक्कांचे जतन करणे त्या-त्या राष्ट्रांची जबाबदारी मानली जाते व त्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या सभासद राष्ट्रांनी त्यांच्या राज्यातील अल्पसंख्यांक नागरिकांच्या हक्कांचे जतन होते की नाही यावर लक्ष ठेवण्यासाठी 'अल्पसंख्याक आयोगाची स्थापना' करण्याचा सल्ला संयुक्त राष्ट्राने दिला होता.

Date :

राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग : भारतीय रचना किंवा स्वरूप

सांस्कृतिक व शैक्षणिक स्वातंत्र्याचा हक्क या अंतर्गत कलम २९ ते ३० अंतर्गत अल्पसंख्यांक गटाच्या संदर्भात संविधानाने केलेल्या तरतुदींचा आढावा घेतला आहे. परंतु घटनेच्या कलम ३३८ नुसार अनुसूचित जाती व जमाती आयोग स्थापन करण्याची जशी तरतूद आहे, तशी तरतूद अल्पसंख्यांक आयोग स्थापन करण्याच्या संदर्भात नाही. असे असले तरी अल्पसंख्याकांच्या हक्काच्या घटनेतील तरतुदींची अंमलबजावणी योग्य प्रकारे होते की, यावर देखरेख ठेवण्यासाठी हक्काचा आयोग नेमावा अशी मागणी भारतीय अल्पसंख्याक जनतेकडून सातत्याने होती. या मागणीचा दबाव सातत्याने वाढत असल्याने भारत सरकारने 'अल्पसंख्यांकासाठी राष्ट्रीय आयोगाची' (National Commission For Minorities) स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार भारतीय अल्पसंख्यांक जनतेला त्यांच्या हक्कांचे संरक्षण, पालन योग्य प्रकारे होते की नाही यावर लक्ष ठेवण्यासाठी भारत सरकारने १९७८ साली अल्पसंख्यांकासाठी एक स्वतंत्र

SAMRAT

आयोग राष्ट्रीय पातळीवर स्थापन करण्याचा आदेश काढला. हा आयोग 'राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग' या नावाने ओळखला जाईल. परंतु या आयोगाने वैधानिक दर्जा मात्र १९९२ साली म्हणजे जवळ-पास १४ वर्षांनी प्रदान करण्यात आला.

Lucky | Page No.:
Date : / /

राष्ट्रीय अल्पसंख्या आयोगाची कार्ये

अ) अन्य आयोगाप्रमाणे या आयोगाने प्रामुख्याने संविधानात्मक आणि वैधानिक सुरक्षा यांच्यावर देखरेख ठेवताना त्यासंबंधीच्या तरतुदीच्या योग्य पालन होते की नाही हे पाहावे. तसे होत नसल्यास त्यासंबंधी वार्षिक अहवाल व शिफारशी सरकारला सादर कराव्यात

ब) अल्पसंख्यांकाच्या अहवालाचे मूल्यमापन करणे.

क) अल्पसंख्यांकाच्या हक्कांचे उल्लंघन आले आहे अशा विशिष्ट स्वरूपाच्या तक्रारी असल्यास त्यांच्या तपास आयोगाने करावा यासाठी या आयोगाला दिवाणी न्यायाधिशांच्या समकक्ष अधिकार प्रदान करण्यात आले आहे.

Date :

निष्कर्ष

राष्ट्रीय महिला आयोगाचे महत्वाचे कार्य म्हणजे महिलांचे सबलीकरण आणि महिलांचे सबलीकरण योग्य प्रकारे होण्यासाठी शासनाला सुधारणा व तरतूदी सुचविणे. राष्ट्रीय आणि राज्य महिला आयोग सर्वोतोपरी महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसून येते व त्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होण्यासाठी आयोग महत्त्वाची भूमिका पार पडते.

अनुसूचित जाती व जमातीच्या उद्धारासाठी व त्यांना वंचित न ठेवता मानवधर्माची वागणूक देवून समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये समावेश करण्यासाठी त्यांचा आर्थिक, सामाजिक राजकीय व शैक्षणिक असा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासन नेहमीच प्रयत्नशील असते. फक्त त्याचा पाठपुरवठा करणे व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य दिशा देण्याचे काम अनुसूचित जाती व जमाती आयोग करत असतो.

भारत हा लोकशाही, धर्मनिरपेक्ष, सार्वभौम असा देश आहे. म्हणजेच देशातील तमाम जनतेला धर्म, भाषा, व संस्कृती याबाबत कोणताही भेदभाव न करता जगण्याचा समान हक्क

SAMRAT

Date :

देतो. म्हणून प्रत्येकाने आपला धर्म, भाषा, संस्कृती आचार, विचार यासोबतच संख्येने कमी असणारे अल्पसंख्यांक यांचेही धर्म, भाषा, संस्कृती टिकवून व जपून ठेवण्यासाठी एका विशेष राष्ट्रीय आयोगाची स्थापना करण्यात आली.

सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांची परिस्थिती व त्यांना येणाऱ्या अडचणींची पाहणी करून त्यावर उपाय सुचविण्याची तरतूद आहे. यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग कायदा, १९९३ साली अधिनियमित केला.

वर नमूद केलेल्या सर्व आयोगांची भूमिका जरी वेगवेगळी असली तरी उद्देश मात्र मानवी हक्क सुरक्षित ठेवणे हाच आहे.

Page no.: ____/
Date: __/__/____/

नाव :- अक्षता अमेश केरकर

इयत्ता : F.Y.

तुकडी :- कला

विषय :- (FC)

परिक्षा क्र :- दोन (2)

प्रकल्पाचे नाव :- जातमजुरांची समस्य

मार्गदर्शक शिक्षक :- प्राध्यापक डॉ.
एम. आर. खोत

2020-22

16/20

Page no.: ____ /
Date: / / /

अनुक्रमणिका

अ क्र	घटक	पान
1)	वैयक्तिक माहिती	1
2)	अनुक्रमणिका	2
3	प्रस्तावना	3
4	बालमजुरांच्या समस्या 1) कायद्याची स्थापना 2) कोर्टीसचा संबंध 3) कारणे 4) बालश्रमाचे निर्मूलन करण्यासाठी काय करण्यात येत आहे : 5) आंध्रप्रदेशने बालमजुरी थोपविण्यासाठी बनविलेला मोहिम 6) राष्ट्रीय बालमजुरी मोहिम- आंध्रप्रदेशांतील जिल्ह्यात 7) तामीळ नाडू - बालमजुर आकडेवारी 8) राष्ट्रीय बालमजुरी मोहिम- तामिळनाडू जिल्ह्यांत	4

UB

Page no.: ____/
Date: __/__/____

प्रस्तावना

आपल्या राष्ट्रासमोर बालमजुरीचा विषय नेहमीच मुक प्रश्न आहे. सरकार नेहमी हा सोडविण्यासाठी पाऊले अचलत असते का, हया प्रश्नाचा आढावा घेतल्यास व त्याची खोली पाहता असे दिसून येते की हा जनता व सरकार दोघांच्या प्रश्न आहे जो गरिबी आणि अशिक्षितता या मुळे वाढतो यासाठी प्रत्येक भागातून योग्य ती पाऊले अचलन हा प्रश्न सोडवला पाहिजे.

१९९९ मध्ये सरकारने बालमजुरीचा अभ्यास करण्यासाठी व त्यावर तोडगा शोधण्यासाठी मुक समितीची स्थापना केली होती त्याचे नाव आहे गुरुपदस्वामी कमिटी. या कमीतीने सर्व बाजूंचा अभ्यास करून असे काही चकीत करणारे मुद्दे मांडले. त्यांना असे लक्षात आले की जो पर्यंत गरिबी पुर्णपणे हटणार नाही तो पर्यंत बालमजुरी थांबवे अशक्य आहे त्यामुळे, कायदेशीर कारवाई हा मुख्य उपाय हा प्रश्न सोडवू शकत नाही. कमितीना वाटले की अशा परिस्थितीत, मुख्य उपाय करता येऊ शकतो तो म्हणजे मुलांच्या आरोग्यावर परिणाम होईल अशा जागी काम करण्यास बंदी करावी व हे थांबवण्याकडे कयान बदल करावे. असे म्हटले जाते की अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी सर्वांना मुक्त येण्याची गरज आहे.

Page no.:
Date: / /

कायद्याची स्थापना

साल्वी गुरुपदस्वामी कमिटीने मांडलेल्या मुद्दयांवरून १९८६ बालमजूर (प्रथोपचार) कायद्याची स्थापना झाली. या कायद्यांतर्गत कोणत्याही लहान मुलांच्या आरोग्यावर परिणाम होईल अशा जागी काम करण्यास ~~प्रतिबंधी~~ बंदी घालण्यात आली व हे थांबवण्यासाठी त्यात बदल करण्यात यावे असा निकाल दिला गेला. कोणते काम हे आरोग्याला धोकादायक असेल याची यादी बालमजूर सल्ला केंद्राच्या वतीने ठरविण्यात आले.

वरील मुद्दयांना अनुसरून, राष्ट्रीय बालमजूर पॉलीसीची सुरुवात १९८७ ला झाली. या पॉलीसीत पहिल्या टप्प्यात आरोग्यावर परिणाम होईल अशा जागी काम करणाऱ्या मुलांना परत निरोगी बनविणे व वा त्यांना त्यावर उपचार देणे यावर जोर दिला गेला. बालमजूर सेसेस.

Page no.: ____/
Date: __/__/____/

कोर्सेराचा संबंध

एम. व्ही फाऊंडेशन ने फार वेगळा मुद्दा हाताळला. त्यांनी काम करणाऱ्या मुलांचे वर्ग भरवून त्यांना रोजच्या शाळेत शिकत असलेल्या त्यांच्या वयाच्या मुलांसोबत येई पर्यंतचे शिक्षण देऊ केले व बालमजुरांना देखील शाळेत प्रवेश मिळवून दिले. ह्यामुळे एक फार चांगली चालना बालमजुरांना मिळाली व त्यांची शाळेची गोडी लागली. ही मोहिम आंध्रप्रदेश सरकारने राबविली व प्रथम, सी. आय. एन. आय, अशा लोक जुंभीश आणि व काही अजून एन. जी. ओ. देखील यांत आहेत.

राष्ट्रीय संस्था व भारतातील बालमजुर

आंध्रप्रदेश :- बालमजुर गणती

१९७१ - १६२७४९२
१९८१ - १९५१३१२
१९९१ - १६६१९४०
२००१ - १३६३३३०

Page no.: /
Date: / /

कारणे

युनिसेफ (UNICEF) च्या मते, मुलांचे शोषण करणे सोपे असते म्हणून त्यांना कामावर ठेवण्यात येते. लहान मुले त्यांच्या वयाला अयोग्य अशा ठिकाणी व अशा प्रकारची कामे का करत असतात यासाठी सामान्यतः त्यांची गरीबी हे पहिले कारण दिले जाते. परंतु यामागे लोकसंख्येचा भडका, स्वस्त मजूर, उपलब्ध असणाऱ्या कायद्यांची अंमलबजावणी न होणे, पालकांनी आपल्या मुलांना शाळेत न पाठविणे (पालक अनेकदा मुलांना पाठविण्यापेक्षा कामावर पाठवितात जेणेकरून कुटुंबाचे उत्पन्न काढेल) व त्यामागे दडलेली प्रचंड गरीबी अशी बरीच कारणे आहेत. आणि जेथे बालश्रम हेच कुटुंबाच्या उपजीविकेचे साधन असेल तेथे कोण काय करू शकते?

बालश्रमाचे निर्मूलन करण्यासाठी काय करण्यात येत आहे?

बालश्रम निर्मूलनासाठी, JG बालश्रम प्रकल्पांना राष्ट्रीय बालश्रम प्रकल्पांना राष्ट्रीय बालश्रम प्रकल्प योजनेच्या अंतर्गत ~~मुक~~ मु मंजुरी मिळाली आहे त्याचा फायदा 150,000 मुलांना होणार आहे. 105,000 मुलांना या आधीच विशेष शाळांत दाखल करण्यात आले आहे कामगार मंत्रालयाने राष्ट्रीय बालश्रम प्रकल्प योजना (NCLP) 600 जिल्ह्यांत राबविण्यासाठी

Page no.:
Date: / /

योजना आयोगाकडे सुमारे 1500 कोटी रुपयांची मागणी केली आहे. सध्या ही योजना 650 जिल्ह्यांत राबविण्यात येत आहे. ढाबा, घरे येथे तसेच इतर 57 धोकादायक उद्योगांत काम करणाऱ्या मुलांना (9 ते 14 वयोगटातील) ह्या योजनेचा फायदा होणार आहे. सर्वशिक्षा अभियानासारख्या ह्या सरकारी योजना देखील राबविल्या जात आहेत.

राज्ये	जिल्हे	मान्यताप्राप्त शाळा	लाभार्थी	प्रलंबित
आंध्र प्रदेश	20	807	43550	
बिहार	8	174	12200	
गुजरात	2	40	2000	
कर्नाटक	3	100	5000	
मध्य प्रदेश	5	138	9800	
महाराष्ट्र	2	74	3700	
ओरिसा	16	430	33000	
राजस्थान	2	60	3000	
तामिळनाडू	8	371	19500	

ગુજરાત મહેસાણા	1	150	11500
પ્રકાશમ જિલ્લા	4	213	12000
મહારાષ્ટ્ર	14	2571	1558250

રાષ્ટ્રીય બાલશ્રમ પ્રકલ્પોની અંતર્ગત અંતર્ગતિ

આંધ્રપ્રદેશનો બાલમજૂરી દૂર કરવા માટે રાખવામાં આવેલી મોહિમ

આંધ્રપ્રદેશના બાલમજૂરી દૂર કરવા માટે રાખવામાં આવેલી મોહિમ (પ્રા.પી.મુલ.બી.પી.) જો આંતરરાષ્ટ્રીય મજૂર સંસ્થાની ભાગીદારી (ઇલાય મુલ્ય ઓર્ગ) દિલ્લીની આંતરરાષ્ટ્રીય મજૂરી સંસ્થા (ડી.મુક આય.ડી.), જો ડેટ ત્રિલ યેથીલ યુ.કે. સરકાર આણિ ઉત્તર ઈરલેંડ આણિ આય.મુલ ઓ ઑફિસ ન્યૂ દિલ્લી ની ભાગીદારી આહે. યા સંસ્થેચ્યા પહિલ્યા ટપ્પ્યાત ઑક્ટોબર 2000 આણિ માર્ચ 2004 ચ્યા મધ્યે કા નિકર્ષ કાઢલ્યાનંતર આમ્હાકો જાસ્તીતજાસ્ત ગાવે બાદશીલ મુલે કી બાલમજૂર આહેત. આંધ્રપ્રદેશાત કા બાલમજૂરીચ્યા આક્રા સર્વાત જાસ્ત આહે નંતર ઉત્તર પ્રદેશા 2009 ચ્યા મોજણી નુસાર જાસ્તીતજાસ્ત બાલમજૂર મુલ્યાંચ્યા આહેત. 10 ટક્કે બાલમજૂર શેખ્યાપાડ્યાત આઢલતાત. ત્યામુલે કે ગરજેચે આહે કી રાજ્યાને પાઉલ ઉચલુન બાલમજૂરી થોપવણ્યા સંદર્ભી પાઉલ ઉચલાયલા પાહિજે જેણે કરુન આંધ્રપ્રદેશાચી સામાન્ય-વ્યાવસાયિક વ ભૌદ્યોગિક વાઢ હોઈલ.

राष्ट्रीय बालमजुरी मोहिम - आंध्रप्रदेशांतील जिल्ह्यांत

अनंतपुर, चित्तोर, चुडापाह, पुर्व गोदावरी, गुनटूर, हैद्राबाद, करीमनगर, कुरनूल, मेडक, नालागोंडा, खम्मम, नेल्लोर, निझामाबाद, प्रकाशम रंगारेड्डी, श्रीकाकूलम विझीयनागराम, विशाखपटनम, वरंगल, पश्चिम गोदावरी, मेहबुबनगर, अदीलाबाद आणि कृष्णा

बालमजुर बंदी व थोपवणे कायदा १९८६ (CHILD LABOUR PROHIBITION and REGULATION) ACT, 1986 :-

घटक	२००३	२००४ (१ चतुर्थांश)
परिक्षणांची संख्या	29355	5211
नुकसानीचे आकडे	16395	2749
निर्णयास नेलेल्या संख्या	0	7
शोधाची संख्या	काही नाही	" 1212/-
केस काईल झाल्याच्या संख्या	4,870	423
दंडा गोळा केल्याचा आकडा	" 2,05,340	" 37,750
शाळा उघडल्याचा आकडा	242	173
सुधारीत मुलांची संख्या	15627	3640

Page no.:
Date: / /

तामिळ नाडू - बालमजूर आकडेवारी

१९७१ - ७२३०५
१९८१ - ९७५०५५
१९९१ - ५७८८८९
२००१ - ४१८८०१

बालमजूर (थोपवणे व कमी करणे) कायदयाची २अंमलात १९८० ला आरोग्यावर परिणाम होईल अशा जागी काम करण्यास बंदी व थोपवणे या त्यात सुधारणा करणे.

राज्यीय बालमजुरी मोहीम- तामीलनाडू जिल्ह्यांत.

चिदंबरनार (कुड्डलोरीन), कोईंबतोर, धर्मपुरी, वेल्लोर, पुडुकोटाई, सालेम, त्रिचूरापल्ली तिरुनेलवेली, इरोड नगरी, चेन्नई ईरोड, दिन्डीगुल आणि थेनी.

Page no.: ____/
Date: __/__/____/

ऋणनिर्देश

मी अक्षता अमेश केरकर शाळा (कला) F.Y.B.A वर्ग २०२०-२१ सा. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवण (F.C) पायाभूत अभ्यास विषयाअंतर्गत बालमजुरांच्या समस्या यावर सादर केलेला प्रकल्प माझे शिक्षक मित्रमैत्रिण यांच्या सहाय्याने व मार्गदर्शकिनाने पूर्ण केला आहे.

मला सहकार्य केल्याबद्दल या सर्वांचे मी ऋणी आहे.

Page no.:
Date: / /

संदर्भसूची

मी अक्षता उमेश केरकर शाखा (कला) F.Y.BA. वर्ष 2020-21 स.का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवण (F.C) पायाभूत विद्याअंतर्गत बालमजुरांच्या समस्या यावर सादर केलेला प्रकल्प आहे. या प्रकल्पाची माहिती मी Google वरुन घेतली आहे. तसेच वर्तमानपत्र, मासिक यातून संकलित केली आहे.

मुंबई विद्यापीठ

स. का. पाटील सिंधुदुर्ग

महाविद्यालय मालवण

प्रकल्पाचे नाव:- कोरोनानंतरचे

सामाजिक आरोग्य

विषय:- पायाभूत अभ्यास

विद्यार्थ्याचे नाव:- श्रद्धा दिपक तांबे

वर्ग:- F.Y.B.Com रो.नं. 32

शैक्षणिक वर्ष :- 2020-21

अनुक्रमणिका

1. प्रस्तावना
2. साहित्याचे सादरीकरण
3. ऋणनिर्देशक

प्रस्तावना

कोरोनाच्या सध्याच्या काळाने (SARS-CoV2) जगात धुमाकूळ घातलाय. त्याच्या वर्तमान व भविष्याविषयी अनेक तर्कवितर्क सुरू आहेत. या विषाणूने मानवजीवनावर, जागतिक घडामोडींवर एवढेच नव्हे; तर प्राणी, वनस्पती, नद्या, आकाश या सर्वांवर आपला प्रभाव पाडला आहे. यामुळे सामाजिक आरोग्य क्षेत्रात काय बदल होतील. हे पुढील माहितीच्या सादरीकरणामुळे समजेल. यामध्ये कोरोनाबद्दलच्या सर्व माहिती आहे.

माहितीचे सादरीकरण: कोरोनानंतरचे सामाजिक आरोग्य !

डॉ. सग्राम पाटील, MD FRCA FFPMRCA,
ग्वेनेड हॉस्पिटल, नॉर्थ वेल्स, यूके । Saturday, 13 June 2020

जागतिक आणि राष्ट्रीय आव्हान :-

"कोरोनामुळे जगातील सर्वच क्षेत्रांत अल्प व दीर्घकालिन असे बदल घडणार आहेत. संसर्ग झालेल्या सर्वच लोकांना काही 'कोरोना' होत नाही. यातले काहीच लोक अतिगंभीर होतात आणि त्यांना 'आयसीयू' ची गरज लागते. "आयसीयू' उपचार करूनही मोठ्या संख्येने लोकांचा मृत्यू होतात. यामुळे आज "कोरोना'चा उपचार करणारे आपले सरकारी रुग्णालय अत्यंत गंभीर समस्येला सामोरे जातांना दिसतांहेत. 'कोरोना' बाधित रुग्ण, यांचे नातेवाईक आणि त्यांच्यावर उपचार करणारे आरोग्य कर्मचारी हे सगळेच मोठ्या मानसिक तणावातून जात आहेत हे जगात सगळीकडेच घडतय. हा मानसिक तणाव "कोरोना' सोबत संपणार

नाही. याचे दूरगामी परिणाम रुग्ण व उपचार करणारे यावर होणार आहेत.

गैर "कोरोना आरोग्यसेवा :-

गैर "कोरोना" आरोग्यसेवा संपूर्ण जगभर अक्षरक्ष: ठप्प झालीय. याचे दुष्परिणाम दिसू लागले आहेत. "कोरोना" नसलेल्या लोकांमध्ये मृत्युचा दर यावर्षी वाढल्याचे अहवाल समोर येत आहेत. याचा सरळ अर्थ हा, की "कोरोना" मुळे या रुग्णांमुळे अक्षम्य दुर्लक्ष केले जात आहे. कॅन्सर, न्यूरोसर्जी, हृदयरोग, डायबेटिस यासंबंधी रुग्णांना जगभर योग्य रीतीने उपचार करण्यास यंत्रणांना अपयश आले आहे. ब्रिटनमध्ये मृत्यूदर गतवर्षाच्या तुलनेत दीडशे टक्के अधिक दिसून येतोय. इटलीमध्ये अधिक वाढलाय. सुखल्वे "कोरोना" बळी असले, तरी मोठ्या प्रमाणात गैर "कोरोना" रुग्णदेखील आहेत. भारतासारख्या देश मृत्यूच्या कारणांची नोंद ठेवण्याचे काम खूप प्रभावीपणे राबवत नसले, तरी आपल्याकडेही मृत्यूचे प्रमाण बरेच वाढलेले आहे. गैर "कोरोना" आरोग्य यंत्रणा पुन्हा वेगाने कार्यरत करण्यावर सरकारला भर द्यावा लागेल. खासगी रुग्णांना आवश्यक त्या सुविधा पुरवून त्याचे काम पूर्ववत करणे जनतेच्या फायद्याचे ठरेल. सरकारी रुग्णालयदेखील व्हिडिओ आणि पूरक्वनीद्वारे रुग्णांना सेवा देऊ शकतात.

आरोग्य विषमता वाढेल :-

जगावर जे आर्थिक संकट येऊन ठेपलेय. त्याने बहुतांश लोकांच्या कमाईवर परिणाम झाला आहे. आजच अनेकांचे उत्पन्न बंद किंवा कमी झाले आहे. याने जगात आर्थिक विषमता नक्कीच वाढलेच. पण. यामुळे

कमी उत्पन्न असलेल्या असंख्य लोकांना आरोग्य सुविधांचा वापर करणेही अवघड होणार आहे. "कोरोना" चा परिणाम म्हणून आरोग्यसेवा महागण्याची शक्यता आहे. आपल्या देशात गरीब-मध्यमवर्गीय, भटके, अस्थायी लोक, मजूर, आदिवासी, महिला, बालक व अल्पसंख्याक यांवर विशेष लक्ष केंद्रित करून योजना आखणे गरजेचे आहे.

मुलांचे शोषण होण्याचा धोका :-

शाळा-महाविद्यालये बंद असल्याने समाजातला हा एक कमजोर घटक अनेक ठिकाणी शोषण करणाऱ्या कटकाच्या तावडीत सापडलेला आहे. "लॉकडाऊन" व मदत मिळण्याची शक्यता नसल्याने त्याचे शोषण होण्याची शक्यता अजूनच जास्त आहे. बालकांच्या मानसिक, शारिरिक, व नैतिक शोषणाचे भरून न निघणारे दूरगामी दुष्परिणाम त्यांच्या जीवनावर आणि पर्यायाने देशावर होणार आहेत. मुलाप्रमाणेच महिलांचेही शारीरिक व मानसिक शोषण या काळात प्रचंड होत आहे."

'लॉकडाऊन' दरम्यान माता व बालकांचे जे हाल दिसले, ते चित्र अनेक महिने किंवा काही वर्षे दिसणार आहे. भावी पिढीच्या रक्षणासाठी वेळीच उपाययोजना न झाल्यास देशाला गंभीर परिनामांना सामोरे जावे लागेल.

"लॉकडाऊन" चा दुष्परिणाम असाही :-

समाजात नैसर्गिकरित्या उपलब्ध असलेली सहाय्यतेची यंत्रणा (सपोर्ट स्ट्रक्चर) "लॉकडाऊन" मुळे पूर्णपणे कोलमडून पडली आहे. त्यामुळे अनेकांचे आजार वाढले आणि मृत्यूही वाढले. एरवी लोक एकमेकांना मदत

करून सफरात असलेल्यांना मदत करतात. ते "कोरोना" कालात खूप कमी साले आहे. त्यातल्या त्यात शुक्रवार मंडळीच "कोरोना" ने घास्तावलेली असल्याने आणि त्यानीही अंशत: "लॉकडाऊन" व "फिजिकल डिस्टन्सिंग" पाळल्याने गरजू रुग्णाचे अधिकच हाल होत आहेत. अशा लोकांमध्ये यापुढेही आजार वाढतील व मृत्यूचे प्रमाणही वाढणार आहे.

इंफोडेमिक :-

प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियाने जगभर लोकांना "कोरोना" विषयी सावधे केले खरे; पण जगभर माहिती व अफवांचा जो भडिमार झाला. (हे "डब्लूएचओ" च्या भाषेत इंफोडेमिक) त्याने समाजात खूप तणाव व अंधश्रद्धाही निर्माण केल्या. "कोरोना" च्या उगमापासून ते त्याला नष्ट करण्याच्या तंत्रापर्यंत सर्वच बाबींवर अनेक तर्कवितर्क, अफवा पसरविण्यात सोशल मीडिया व्यस्त आहे. याबाबतीत वैद्यकिय क्षेत्रातील लोकांनी पुढे येऊन लोकांमधील गैरसमज दूर करणे गरजेचे आहे. ज्योतिष व धर्माचे तथाकथित रक्षक स्फुरणातीला अनेक मनोरंजक कल्पना घेऊन समोर आले खरे; पण सुदैवाने त्यांचे ग्रह सध्या अंधारात लपलेले दिसताहेत. "कोरोना" मध्ये कुठलाही गुणवा नसलेली औषधे आज प्रचार करून वाटली व विकली जाने.

"लॉकडाऊन" मुक्ती, दुसऱ्या लाटेचा धोका :-

"कोरोना" मधून बाहेर पडण्यासाठी "लॉकडाऊन" टप्प्याटप्याने शिथिल करून जनजीवन पुन्हा सुरळीत करण्याचा संपूर्ण जगात आता प्रयत्न होत आहे.

"लॉकडाउन' मुक्ती आणि "कोरोना मुक्तीच्या आधी प्रत्येक देशाच्या सरकारने संसर्गाचा प्रसार कमी असल्याची खात्री करणे गरजेचे आहे याशिवाय, आरोग्य यंत्रणा, 'कोरोना' च्या आणि सौर "कोरोना' आजारांच्या। उपचारासाठी सक्षम आहे. स्पॅनिश फ्लू' मध्ये एका शतकापूर्वी दुसरी व तिसरी लाट देशील आली होती. यात दुसऱ्या लाटेने सर्वाधिक बळी घेतल्याचे आपल्याला माहित आहे. त्यामुळे 'लॉकडाउन' शिथिल करताना या गोष्टीचे भान सरकार, प्रशासन व जननेला ठेवणे गरजेचे आहे. दुसरी लाट खूप मोठ्या प्रमाणावर आल्यास अजून मोठ्या संख्येने गरीब लोकच यात बळी जातील, हे निश्चित. यंत्रणांची सुसज्जता ठेवणे याला पर्याय नाही.

ही व्यसनमुक्तीची वेळ नाही :-

एकंदरीत व्यसनी लोकांकडे हेटाळणी-पूर्वक पाहण्याचा दृष्टिकोन समाजात दिसतो. अनेकांना "लॉकडाउन' ही संधी आहे. आणि दारू ~~बंद~~ वगैरे बंदच ठेवा, असेही वाटते. व्यसनमुक्ती हा तसा सोपा मुद्दा नाही. व्यसन असलेल्यांना। अशा काळात दुहेरी समस्यांना सामना करावा लागतो. दारू-सिगारेटचा सतत पुरवठा मुसेल, तर त्यांचे शारिरीक व मानसिक आरोग्य बिघडून, गंभीर समस्या उद्भवतात. दारू अचानक बंद करणे हि एक 'मेडिकल इमर्जन्सी' होऊ शकते. हे 'लॉकडाउन' करताना सरकारनेही ध्यानात घेतलेले नाही. दारूची दुकाने उघडल्यावर उद्भवलेला सगळा नजारा पाहिला असेल. म्हणून अशा लोकांची हेटाळणी करून चालणार नाही. आगामी काळात व्यसनी लोकांच्या

आरोग्य समस्या, मानसिक आजार, घरगुती हिंसाचार अशा समस्या वाढलेल्या दिसून येतील. त्यादृष्टीने सरकारी यंत्रणा सज्ज कराव्या लागणार आहेत.

"घरलं तर चावतो, सोडलं तर पडतो":-

महाराष्ट्र राज्य हे "कोरोनाच्या" प्रसारात सर्वात जास्त धोक्यात असल्याने आपल्याकडे सर्वच यंत्रणावर सध्या ताण आलाय. सरकार एकंदरीत योग्य दिशेन पावले टाकताना दिसत असेल, तरी आगामी काळ खूप कठीण असणार आहे. सरकारने याची अत्यंत काळजीपूर्वक हाताळणी करणे आवश्यक आहे. "लॉकडाउनने प्रसार कमी होतोय; पण त्याने लोकांचे हाल जास्तच झाले. एकीकडे "कोरोना" च्या प्रसाराचा धोका आणि दुसरीकडे लोकांचे होणारे हाल, यात योग्य समन्वय साधणे खूप अवघड आहे." कोरोना'ची परिस्थिती ही " घरलं तर चावतो आणि सोडलं तर पळतो ' अशी झालीय.

आशेचा किरण :-

"कोरोनाचा' प्रसार काही महिने वाढतो आणि त्यानंतर तो कमी होतो. असा जगातील काही देशाचा अनुभव आहे. (उदा. चीन, इटली, ब्रिटन) याशिवाय, "कोरोनाचा धोका हा लहान मुले, महिला व तरुणांना कमीत-कमी आहे., हे आता सिद्ध झालेय. अनेकाना " कोरोनाची लागण होऊनही त्यांना काहीच त्रास होत नाही व ते सुखरूप बाहेर येतात. अशा लोकांची संख्या खूप मोठी आहे. काही अहवालानुसार दहाहजार लोकांना लागण झाल्यास एकाला मृत्यू येतो.

उपचार अन् लस शोधण्यासाठी :-

"कोरोना"चा प्रभावी उपचार व त्यावरील लस शोधण्यात आज जगभरातील शास्त्रज्ञ व डॉक्टर मंडळी जोमाने कामाला लागतील. समाजातील अनेक लोक जेव्हा "कोरोना" संसर्ग होऊन आपल्या शरीरात प्रतिकारशक्ती निर्माण करतील, तेव्हा "कोरोनाचा"चा प्रसार मंदावेल आणि तेव्हाच "कोरोना मुक्ती होईल, असे काही तज्ज्ञ म्हणत आहेत. याला "हर्ड इम्युनिटी" असे म्हणतात. एकंदरित "कोरोना" लगेच जाईल, असे वाटत नाही. आणि "कोरोना जेवढ्या लोकांना कोरोनाशी संबंधित दुष्परिणाम मारणार आहे. हे येत्या काही वर्षात आपल्याला दिसणार आहे एकंदरीत, 'कोरोना' मुक्ती लगेच शक्य नाही. या विशेषतः 'हर्ड इम्युनिटी' प्रभावी उपचार व लस आल्यानंतर हळूहळू "कोरोना" एक साधा आजार होईल. तो त्याचे काम करत राहील. आणि आपल्याला आपले काम करावे लागणार आहे.

कोरोना व्हायरसची लक्षणं कोणती आणि आपण काळजी काय घ्यायची :-

ताप, खोकला, त्याचप्रमाणे पुरेशी हवा श्वसनवाटे आत घेता न येणे आणि श्वासोच्छ्वासामध्ये येणाऱ्या अडचणी, ही या संसर्गाची मुख्य चिन्हं आहेत.

कोरोना व्हायरसपासून बचावासाठी आपण काळजी घेणं आवश्यक आहे. त्यासाठी साबणाने किंवा जेलने वारंवार हात धुवावेत. आजारी लोकांशी जवळचा संपर्क टाळावा आणि स्वतःचे डोळे, नाक, आणि तोंड यांना न धुतलेल्या हातांनी स्पर्श करू नये.

हि काळजी घेतल्यास संसर्गाचा धोका कमी होईल.
खोकला आणि शिंक आल्यावर रुमाल वापरावा. कफ व शेंबूड फुसून हात धुवून घ्यावेत. अस केल्यास हा आजार पसरण्याचा धोका कमी होईल.

कोरोना विषाणूच्या जागतिक उद्रेकाचे संकेत :-

·बीबीसीचे वैद्यकीय प्रतिनिधी फर्गस वॉल्श यांनी केलेलं विश्लेषण

दक्षिण कोरिया, इराण आणि इटली एकाचित परिस्थिती पाहिली असता जगातिक साथीचे सुरुवातीचे टप्पे सुरु झाल्याचे संकेत मिळत आहेत. जगाच्या विविध भागांमधील समुदायात कोरोना विषाणू पसरण्याचे, जागतिक उद्रेकाचे हे संकेत आहेत.

यातील प्रत्येक देशामध्ये चीनशी संबंध न येताही विषाणू पसरत असल्याचं दिसत आहे. इटलीमध्ये प्रसाशला आळा घालण्यासाठी सुरु असलेले प्रयत्न चीनशी सामर्थ्य जागणारे आहेत.

विशेषत: इराणमधील परिस्थिती अधिक चिंताजनक आहे, कारण तिथल्या आरोग्य प्रशासनाने म्हटल्यानुसार, देशातील अनेक शहरांमध्ये हा विषाणू पसरला आहे, आणि लेबनॉनमधील पहिला रुग्ण इराणमधून आलेला प्रवासी असल्याचं समोर आलं आहे.

चिंताजनक वाढ :-

कोविड - १९ साथ पसरल्यापासूनच्या काळात मृत्यूची इच्छा व्यक्त करणाऱ्यांच्या किंवा आत्महत्येची कल्पना बोलून दाखवणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे, असे या सर्वेक्षणात भाग घेतलेल्यांपैकी ७० टक्क्यांहून अधिक थेरपिस्टनी नमूद केले. काही ~~थेरि~~ थेरपिस्टच्या मते आत्महत्येचा विचार करणाऱ्यांच्या संख्येत १० टक्क्यांहून कमी वाढ झाली आहे.

स्वतःला ईजा करून घेणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे सुमारे दोन-तृतीयांश थेरपिस्ट्सनी सांगितले. यातील २९ टक्क्यांनी खात्रीपूर्वक वाढ झाल्याचे सांगितले, तर ३६ टक्क्यांनी तशी शक्यता व्यक्त केली. यापूर्वी मानसिक आरोग्यविषयक समस्यांतून बाहेर आलेल्या किंवा बाहेर येण्याच्या प्रक्रियेत असलेल्या रुग्णांमध्ये मानसिक आजारांनी पुन्हा डोके वर काढले आहे, असे ६० टक्के थेरपिस्ट्सनी सांगितली. "यातील अनेक रुग्णांना औषधे किंवा उपचार मिळवणे कठिण झाले असल्याने त्यांचे आजार पुन्हा डोके वर काढत आहेत. हे प्रमाण ग्रामीण भागात अधिक आहे." असे वरंबल्ली म्हणाले.

चिंता (८८.७ टक्के), नोकरी जाणे (७६.१ टक्के), ताण (७३.६ टक्के), एकाकीपणा (७३ टक्के) आर्थिक असुरक्षितता (७३ टक्के) ही मानसिक आजारासाठी उपचार घेऊ इच्छिणाऱ्या रुग्णांनी दिलेली प्रमुख कारणे आहे.

"बहुतेक प्रकरणांमध्ये चिंतेचा स्तर खूप अधिक आहे. हा बहुतेकदा कोरोनाशी थेट संबंधित नाही पण पूर्वीच्या समस्यांनी तीव्रता या कालखंडात नक्कीच वाढली आहे. यामुळे दडपल्यासारखी भावना निर्माण होत आहे आणि त्यातून आत्महत्येचा विचार वाढीस लागत आहे," असे ~~जन्नू~~ जून थॉमस या बेंगळूरुस्थित समुपदेशकांनी सांगितले. एकंदर देशातील मानसिक आरोग्याची स्थिती गंभीर आहे असे

या सर्वेक्षणातून दिसून येत आहे.

मानसिक आरोग्यासाठी मदत मागणाऱ्यांमध्ये तरुण व्यावसायिक, विद्यार्थी आणि स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. मानसिक आजाराचे प्रमाण मात्र लोकसंख्येच्या सर्व वर्गामध्ये, सर्व स्तरांवर खूप आहे. काही वर्षांनील लोक त्यासाठी वैद्यकीय मदत घेत आहेत. एवढेच," असे एसपीआयएफचे रिसर्च कन्सल्टण्ट नूर मलिक म्हणाले.

विज्ञान शाखेच्या एका विद्यार्थ्यीसाठी लॉकडाउनचा काळ खूपच खडतर जात आहे. ती विद्यार्थ्यीनी 2018 सालापासून बायपोलर डिसऑर्डरसाठी वैद्यकीय मदत घेत आहे. "कोविडपूर्व कालात मी बहुतेक वेळ माझ्या अभ्यासातील कामात व्यग्र असायचे आणि बाकी गोष्टींची चिंता करायला वेळ नसायचा. तेव्हा मी शांत असायचे. लॉकडाउनच्या कालात घरात बसावे लागत आहे. आणि घरगुती कामे सोडल्यास करण्यासारखे काही नाही. मग माझ्या मनात भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकालाबद्दलचे विचार येत राहिले. आणि त्यामुळे माझी चिंता वाढून नैराश्य आले," असे तिने नमूद केले. ती फेब्रुवारीपासून तिच्या डॉक्टरांना प्रत्यक्ष भेटू शकलेली नाही. व्हॉट्सअॅपवरून तिची थेरपी सत्रे सुरू आहेत पण आमची उपचार सामान्य उपचारांहून खूप वेगळे आहेत. आपण प्रत्यक्ष संभाषणात जे व्यक्त करू शकतो ते व्हिडिओमध्ये करू शकत नाही, असे ती म्हणाली. मुसळधार पावसामुळे इंटरनेटची कनेक्टिविटी कमी झाल्यामुळे अडचणीत भर पडल्याचेही तिने सांगितले. अर्थात ती मित्रमंडळांशी बोलत आहे नवीन भाषा शिकण्याचा प्रयत्न करत आहे. तिच्या प्रोजेक्टचे नियोजन करत आहे. अधिक झोप येत आहे आणि याची तिला मदत होत आहे.

माध्यमांसाठी किमान नियमावली व नियमांची अंमलबजावणी :-

कोरोना विषयाच्या बातम्यांचे विश्लेषण केले, तर लक्षात येईल अतिशय हिंसक भाषेतच बातमी दिली पाहिजे, अशी जणू प्रथाच पडली आहे. 'कोरोनाचा हाहाकार', 'कोरोनाचे महासंकट' असे शब्द वापरायलाच हवेत का? अशा प्रसारामुळे माणसांच्या मनात नकारात्मक भावना मध्ये वाढ होतच. लोकांनी घाबरून न जाता आवश्यक ती काळजी, मात्र घ्यावी, असा विचार करून शब्दांची निवड करणं शक्य आहे.

एकूणच नैसर्गिक किंवा मानवनिर्मित संकटातून बाहेर पडायला आपण तयार आहोत का? मागच्या वर्षी पश्चिम महाराष्ट्रात आलेल्या पुरात अनेकांना मदत मिळाली असेल, पण त्यांच्या मानसिक आरोग्याचं काय झालं, असा प्रश्न राहतोच. 'कोरोना' आपल्याला पुढचे काही महिने पुरणार असे दिसते. आधी आपण गाफिल राहतो पण पुढील महिने कमीत-कमी मानसिक त्रास कसा होईल याबाबत उपाय योजना आवश्यक आहेत.

गौरी जानवेकर, या समुपदेशक असून मानस शास्त्राच्या अभ्यासक आहेत.

मानसिक आरोग्याच्या सुविधा पुरवणे :-

जसे वैद्यकिय सेवा या अत्यावश्यक मानल्या जातात. तशाच मानसिक आरोग्याच्या सुविधाही असाव्या लागतात. हे खरच शक्य आहे का? सरकारी पातळीवर अशा सुविधा सरकारला पुरवता येऊ शकतात.

नर त्याचं उत्तर फेबल सरकारने दिले आहे. तिथे जवळपास तीस हजार लोकांनी मानसिक आरोग्याच्या सेवांचा लाभ घेतला. सेवांना लागणारा वेळ व होणारा खर्च लक्षात घेतला. आपल्याकडे पारंपरिक पद्धतीने चालणारी मनोपचार पद्धती अवघड आहे. समुदाय मानसोपचार (Community Psychotherapy) सारख्या पर्यायांचा विचार नक्की होऊ शकतो. यासाठी सरकारी पातळीवर पुढाकार आवश्यक आहे.

किमान पातळीचं नियोजन आवश्यक :-

जेव्हा माणसांच्या आयुष्यावर परिणाम करणारे निर्णय होतात, तेव्हा किमान पातळीचं नियोजन आवश्यक आहे. टाळेबंदीसाठी तसाही उशीर झालाच होता. मग मजूरांना आपल्याला घरी जाऊ देऊन, योग्य आणि नेमक्या सूचना देऊन टाळेबंदी केली असती तर? असंपण आपल्याकडे सरप्राइज (Surprises) ला कधी नको इतकं महत्व आलं आहे. नोटबंदीसाठी निर्णय झाला तेव्हा माणसाची चिंता कितीतरी वाढली होती. ज्यांना आधीपासून मानसिक समस्या होत्या त्यांच्या लक्षणांमध्ये वाढ झाली होती. कोणत्याही प्रकारची अनिश्चितता मानसिक त्रासात भर घालते तर स्पष्ट सूचना आणि नियोजन, मानसिक स्वास्थ्याच्या दृष्टिने अतिशय आवश्यक असते.

कोरोना आणि मानसिक ताण :-

समाजातील एक गट असा आहे. ज्यांच्यासाठी हा काळ आपत्ती बनून आला नाही, पण त्याचा मानसिक ताण निश्चितच वाढला होता. उदा. काही लोकांना कोणतेही वैद्यकीय शिक्षण नसताना 'रेड झोन' मध्ये सर्वेक्षणाची,

आरोग्य तपासणीची काम करावी लागली असे लोक. शिक्षक तसेच असे लोक त्यांच्या नोकऱ्या गेल्या किंवा पुढे जातील. काहींच्या पगारामध्ये कपात झाली. जे एकटे राहत आहेत. किंवा ज्यांचे नातेवाईक त्यांच्यापासून लांब आहेत.

असेही लोक होते, ज्यांची आर्थिक परिस्थिती तशी बरी आहे, पण कल्पनांनी वाढला आहे. उदा. उद्या फिराणा मिळालाच नाही तर? माझ्या जवळच्या माणसांना संसर्ग झाला तर? मला योग्य उपचार मिळालेच नाही तर? अशा अनेक विचारांनी माणसांना त्रास होत होता आणि अजूनही होत आहे. ज्यांचे काम पूर्णपणे घरून चालू आहे आणि घर आणि ~~घर~~ कामाचं तारतंत्र सांभाळाव लागतयं अशा लोकांना गंभीर मानसिक आजारांना सामोरे जावे लागत नाही, पण ताण वाढून त्याचा परिणाम आरोग्यावर निश्चितच झालेला दिसत आहे. विविध सरकारी खात्यांमध्ये एकवाक्यता नसण हेही ताणाचं कारण दिसलं.

कोरोना आणि नित्यक्रमांमध्ये आलेला बदल :-

काही लोकांना खूप बदल जाणवला नाही. पण बाहेर फिरता येत नाहीये. जीममध्ये जाता येत नाहीये, बाहेर ~~फिरता~~ जेवायला जाता येत नाही, यामुळे जो कंटाळा आला त्यानेही ताण वाढलेला दिसला पण तिथे सतनबाकी वाढवणे एवढा एकच उपाय दिसतो.

सगळ्याच मानसिक समस्यांचे मूळ, अनिश्चिततेमध्ये आहे जेव्हा नेमकी माहिती मिळत नाही, भविष्यात काय होणार हे कळत नाही तेव्हा ताण जास्त आढळतो. कोविड १९ बद्दल योग्य माहिती पसरून लोकांना आश्वस्त करता आल असत पण तसं झालं नाही.

कोरोना, टाळेबंदी आणि मानसिक आरोग्य :-

भारतात कोरोनाचा पहिला रुग्ण 30 जानेवारीला आढळला. त्यानंतर मार्चपर्यंत जगभरातून अनेक बातम्या येत होत्या. आणि सगळ्यांचीच अस्वस्थता वाढत होती. मार्चच्या अखेरीस आपल्याकडे टाळेबंदीला सुरुवात झाली., पण मधल्या दोन महिन्यात सगळ्यांनी काय अनुभवल? तर एका टोकाला होती बेफिकीर, अतिविश्वास आणि अहंभाव तर दुसऱ्या टोकाला भीती, शंकांची चिंता आणि संताप.

आपल्याकडे कोणतीही समस्या येवो, शारिरीक आरोग्यालाही जिथे फारच कमी महत्त्व दिलं जातं, तिथे मानसिक आरोग्याची काय कथा? आपल्याकडे एकूण आरोग्यासाठी असलेले बजेट जीडीपी (GDP) च्या 1.6% इतकच म्हणजे फारच कमी आहे, त्यात मानसिक आरोग्यासाठी 1 टक्क्यापेक्षाही कमी बजेट आहे. 2019 च्या जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) च्या अहवालानुसार भारतात 20 कोटी लोकांना प्रत्यक्ष मानसिक आरोग्याच्या सुविधांची आवश्यकता आहे. आणि भारताचा नैराश्यग्रस्त व्यक्ती असलेल्या देशात सहावा क्रमांक लागतो. म्हणजे खरतर मानसिक आरोग्याला आपल्याकडे प्राधान्यक्रम असला पाहिजे, पण तसे होताना दिसत नाही. (WHO बद्दल मनात शंका असतील तरी या माहितीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.)

जेव्हा कोणतीही आपली किंवा सायीचे आजार येतात, तेव्हा अचानक असही यातना उभी करण शक्यच नसतं ती वेळ निभावून नेली जाते. आणि होणाऱ्या परिणामांमुळे अनेकांना अनेक वर्ष जगावं लागतं.

'कोविड १९' किंवा कोरोना हा आपल्यासाठी असाच शारिरीक आणि मानसिक समस्या घेऊन आला. यामध्ये 'कोविड १९' मुळे निर्माण झालेल्या मानसिक समस्या आणि टाळेबंदीमुळे (lockdown) मुळे निर्माण झालेल्या समस्यामध्येही फरक करायला हवा. सुरुवातीच्या काळात दोन टोकाच्या प्रतिक्रिया दिसल्या. एकीकडे टोकाची बेफिकीर आणि दुसरीकडे टोकाचा ताण. काही माणसे जणू काही घडतच नाहिये अशा प्रकारे वागत होती. गर्दी करणे, मास्क न वापरणे, बारवा खेळणे. असे अनेक प्रकार त्यातून घडले.

सुरुवातीच्या काळात जेव्हा लोकांचा मानसिक ताण वाढायला लागला तेव्हा मला यासाठी हेल्प लाईन करण्याची गरज वाटली आणि तसे आवाहन मी इतर समुपदेशकांना (Counsellors) सोबत मिळीयावरुन केले. या आवाहनाला महाराष्ट्रातील विविध भागातून म्हणजे पुणे, मुंबई, नगर, कोल्हापूर येथील पन्नास समुपदेशकांनी प्रतिसाद दिला. प्रत्येक समुपदेशकाने दिवसातून दोन ते तीन तास यानुसार वेळ दिला. त्यानुसार प्रत्येकाचा मोबाईल नंबर आणि वेळ असे पत्रक करुन विविध माध्यमातून ते प्रसारित केले. २४ मार्चपासून या गटाचे काम सुरु झाले. या आमच्या प्रयत्नाला आम्ही 'मनोबल' असे नाव दिले.

यातील आलेल्या फोन्सद्वारे विचारलेल्या केलेल्या प्रश्नांचे विश्लेषण अजून बाकी आहे, परंतू साधारण दिलेल्या समस्या इथे मांडत आहे.

ऋणनिर्देशक

मी सादर केलेला प्रकल्पाचे नाव कोरोना नंतरचे सामाजिक आरोग्य कोरोनानंतरचे आरोग्य कसे असेल त्याचे दुष्परिणाम त्याचा धोका या विषयावर मला खूप माहिती गोळा करावी लागली ही माहिती गोळा करत असताना मला प्रथमत: बी. एच. चौगुले सर यांनी मला चांगले मार्गदर्शन केले. तसेच इंटरनेटद्वारे मला महत्त्वाची माहिती मिळाली. तसेच माझ्या मित्र-मैत्रिणींनी मला खूप मदत केली या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानते.

Rajdhani
DATE / /

प्रकल्पकाचे नाव :- यतिका संजय परब.

प्रकल्पाचे नाव :- पिण्याचे स्वच्छ व शुद्ध पाणी व आरोग्यव्यवस्था

विषय :- एफ. सी

वर्ग :- S.Y. B.A

मार्गदर्शक शिक्षक :- डॉ. एम आर. खोत

सन :- 2020. 2021

16/20

Rajdhani
DATE / /

अनुक्रमणिका

अ. क्र	विषयाचे नाव	गुण	सही
1)	प्रकल्पाचे नाव		
2)	प्रस्तावना		
3)	प्रकल्पाची माहिती		
4)	श्रुतानिर्देश		
5)	संदर्भ		
6)	प्रतिज्ञापत्र		

Rajdhani
DATE / /

प्रस्तावना

नदीचा, विहीर, ओढे, हातपंप इत्यादींपासून आपल्याला पाणी मिळते. परंतु हे पाणी पिण्यास योग्य असतेच असे नाही. नदीकाठी विधी शिवाय जनावरे धुणे, कपडे धुणे, भांडी घासणे अशी कामे केली जातात. शिवाय पालापाचोळा, घाण वैगरे पडलेच असते. त्यामुळे पाणी वारंवार दूषित होत असते. अशा पाण्यामुळे अतिसार, पटकी, विषम, ज्वर, कावीळ यासारखे घातक आजार होऊ शकतात. अनेकांना माहिती नसते की वरवर स्वच्छ दिसणाऱ्या पाण्यामध्ये सुद्धा नुसत्या डोळ्यांना न दिसणारे अनेक जंतू असू शकतात म्हणून पाणी वापरण्यापूर्वी पिण्यायोग्य म्हणजेच शुद्ध करून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

पाणी म्हणजेच जीवन म्हणूनच मानवी जीवनात स्वच्छ व शुद्ध पाण्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. जलजन्य आजार व त्याला प्रतिबंध करण्यासाठी पाणी शुद्धतेबाबत माहिती व करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. पाणी शुद्धता म्हणजे पाण्यातील भौतिक जैविक व रासायनिक घटकांची तपासणी करून त्याची योग्यता पिण्यासाठी, शेती साठी व उद्योगधंद्यासाठी ठरविणे होय.

संबधित विषयाची माहिती

Rajdhani
DATE / /

स्वच्छ पाणी

पाणी जीवन आहे. माणसाला जगण्यासाठी पाणी आवश्यक आहे. माणसाला, जनावरांना, पशूंना पिण्यासाठी पाणी लागते. जे सजीव आहेत त्यांना सर्वांना पाण्याची आवश्यकता आहे. आपल्या शरीराचा ७०% हून अधिक भाग हा पाण्यापासून बनलेला असतो. शरीराला निरनिराळ्या माध्यमातुन पाण्याची ऊर्जा भासत असते. आणि ही ऊर्जा याना त्या प्रकारेन आपण भागवित असतो. पाचकरस आणि रक्त तयार होण्यापासून किंवा शहरातील टाकाऊ पदार्थ शरीराबाहेर टाकण्याच्या प्रक्रियेपर्यंत पाणी हाच घटक शरीरात काम करत असतो.

पिण्याच्या पाण्याची स्वच्छता

. पिण्याचे पाणी आणण्यासाठी नेहमी स्वच्छ भांडी वापरा. वीत ते दररोज विसळावे. पाणी भरताना चारपदरी फडक्याने गाळून घ्यावे.

. भांडी भरल्यानंतर त्यावर झाकण ठेवावे.

. भांड्यातले पाणी पिताना पाण्यामध्ये अस्वच्छ हात बुडवले तर पाण्यात जंतू मिसळतात व वाढतात. म्हणून भांड्यातून पाणी काढण्यासाठी दांडीचे भांडे वापरावे. पाणी पिण्यासाठी स्वच्छ पेला. तांब्या वापरावा.

. साठीच्या दिवसांत पाणी उकळून प्यावे. पाणी कमीत कमी २० मिनिटे उकळून घ्यावे. म्हणजेच त्यातील रोगजंतू मारतात.

शक्यतो हातपंपाचे पाणी. पाचव्या नसलेल्या विहीरीचे पाणी पिण्यासाठी वापरावे. किंवा सार्वजनिक विहीरीत टी.सी.एल टाकून ते पाणी पिण्यासाठी वापरावे. परंतु तिथे दुर्गंध येणार होणार नाही याची काळजी घ्यावी.

Rajdhani
DATE / /

पाणी शुद्धीकरण

नळयोजना असल्यास त्या केंद्रावरच शुद्धीकरणाचे उपाय करता येतात. मग घरोघरी ते करण्याचा त्रास वाचतो. शुद्ध पाण्याचा पुरवठा ही मुलभूत गरज आहे. ही गरज भागवल्याशिवाय फार सुधारणा होत नाही.

बोअरवेल पंपाचे पाणी खडकाळातून येत असेल तर ते सहसा जंतदृष्ट्या शुद्ध असते. सर्वसाधारणपणाने महाराष्ट्र आणि दुष्ट्यनच्या पठारावर खूप खोल गेल्याशिवाय पाणी लागत नसल्याने बोअरवेलचे पाणी साधारण शुद्धच असते. इतर विहीरींची गोष्ट वेगळी आहे. त्यामधले पाणी खडकाळातून येत असेल तरी वरचे पाणी त्यात मिसळते. उघड्या कच्च्या विहीरी सुरक्षित करायच्या तर पायऱ्या काढून टाकून त्या आतून बांधून, कट्टा फरशी करून झाकून, पाणी उपसण्यासाठी कोणती यंत्रणा बसवावी लागते. नाहीतर मग रोजच्या रोज क्लोरिंग पावडर टाकणे हाच उपाय उरतो. पण याचा अर्थ व खर्च ग्रामपंचायतीच्या आवाक्याबाहेर जातो. व त्यामुळे निरनिराळे घरगुती उपाय ही पाण्यावर घेता येतात. पण विहीरीतल्या साठ्यावर उपाय करणे कमी खर्चाचे व कमी त्रासाचे आहे.

पाणी शुद्धीकरणाच्या घरगुती पद्धती

नदया, तलाव, ओढे, झरे यांचे पाणी हे बहुधा खराब असते. पाणी शुद्ध करण्यासाठी खालील उपाय आहेत.

साठवण आणि निवळणे

पाणी भांड्यात गाळून, साठवून स्थिर ठेवल्यानंतर काही वेळ जाऊ दिला तर गाळ खाली बसतो. 24 तास स्थिर ठेवून पाणी वापरल्यास त्यातले 90 टक्के जंतू नष्ट झालेले असतात. कारण फिरून ही क्रिया लवकर होते. ही सर्वात

Rajdhani
DATE / /

स्वस्त व सोपी पद्धत आहे. साधारण काळात मात्र रासायनिक शुद्धीकरण केलेले बरे.

शेवग्याच्या बिया वापरून शुद्धीकरण

तुरटीच्या ऐवजी शेवग्याच्या बियांची पूड वापरून पाणी निवळता येते. तुरटी ही आरोग्याला हानिकारक असल्या. मुळे शेवग्याच्या बियांचा वापर निर्धोक आहे. प्रथम वाळलेल्या शेवग्याच्या शेंगा घेऊन त्यातील बी काढून घ्यावी. बी ची टरफले काढल्यानंतर सफेद दिसण्यासारख्या बियांची बारीक पावडर करून घ्यावी. पाणी स्टीलच्या किंवा ताब्याच्या भांड्यात घ्यावे. साधारण 10 लिटर पाण्यासाठी 15-20 बियांची भरून पावडर करून ती ह्व्वा-वार पाण्यात टाकावी. जर पाणी गढूळ दिसत असेल तर बियांच्या पावडरचे प्रमाण वाढवावे. बियांची पावडर टाकल्यानंतर पाणी 1 तासांनंतर गाळून घ्यावे.

रासायनिक शुद्धीकरण

ब्लिचिंग पावडर वापरून पाणी निर्जंतुक करता येते. नदीच्या तलावांचे पाणी भरून आणायची पद्धत असेल तर घरोघर हा उपाय करावा लागेल. यासाठी क्लोरीनच्या गोळ्या किंवा पातळ औषधे मिळतात. गोळ्यांच्या पाकिटावर किंवा औषधांच्या बाटलीत किंवा पाण्यात किती रसायन मिसळायचे ते दिलेले असते. औषध किंवा गोळी टाकल्यानंतर ते पाणी साधारे अर्धा तासाने वापरावे. औषध किंवा गोळी नसल्यास क्लोरीन द्रावण तयार करता येते.

Rajdhani
DATE / /

आरोग्यसेवे पुढच्या समस्या

काही समस्यांमुळे आरोग्यसेवांवरचा एकूण खर्च वाढत चालला आहे. शासकीय आरोग्यसेवा यामुळे अडचणीत येत आहेत. यावरही काही पर्याय आहेत. उदा : आरोग्यसेवेची रचना विस्तारीय करून प्राथमिक स्तरावर ६०-७०% आरोग्यसेवा देता येत्यास बराच खर्च वाचतो. निरनिराळ्या देशांमध्ये यासाठी निरनिराळ्या प्रकारची प्राथमिक आरोग्यसेवेची व्यवस्था आहे.

शहरे-खेडे विषमता

अनेक देशांमध्ये कमी अधिक ग्रामीण भाग असतोच. अमेरिका व युरोपमध्ये देखील असे ग्रामीण भाग आहेत. अविकसित देशांमध्ये ७०-८०% पर्यंत ग्रामीण जनता आहेत. बहुतेक देशांमध्ये खेडे-पातळीवर आरोग्यसेवा पुरवणे हे मोठे अवघड काम आहे. याचे मुख्य कारण ग्रामीण जनतेची आर्थिक परिस्थिती बरी नसते आणि सामाजिक सोयी कमी असतात. यामुळे डॉक्टर आणि नर्सेस त्या ठिकाणी राहायला तयार नसतात. यामुळे अनेक देशांमधील खेड्यांमध्ये प्रशिक्षित आरोग्य कार्यकर्ते नेमून काम चालवले जाते. निरनिराळ्या देशांमध्ये असे कार्यकर्ते निरनिराळ्या नावांनी ओळखले जातात. काही देशांमध्ये परिचारिकांना जरासे प्रशिक्षण देऊन ग्रामीण आरोग्यसेवा चालवल्या जातात.

Rajdhani
DATE / /

आरोग्यसेवेचे महत्त्व

प्रत्येक देशाच्या जडणघडणीमध्ये शिक्षण आणि आरोग्य ही मानव-विकासाची मूलभूत क्षेत्रे आहेत. गेल्या शतकात प्रत्येक देशामध्ये एक स्वतंत्र आरोग्यव्यवस्था तयार होत गेली. त्या त्या देशाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, तंत्रज्ञानिक परिस्थिती प्रमाणे आरोग्यव्यवस्था घडत गेल्या. त्या, त्या देशाच्या उपलब्धतेनुसार काही देशात जनतेच्या संघर्षामुळे आरोग्यसेवा विकसित होऊ शकल्या नाहीत. आपल्या देशात मिश्र आरोग्यव्यवस्था आहेत. यात ग्रामीण, शहरी, दुर्गम, कमजोर सरकारी तर प्रबळ खाजगी आरोग्यसेवा निर्माण झाली आहे. आपल्या आरोग्यसेवा बघाच समस्या आहेत. देशादेशांच्या प्रयोगांमधून आणि विकसित प्रारूपांमधून आपणही काही नवीन प्रयोग करू शकू. म्हणूनच निरनिराळ्या देशांच्या आरोग्यव्यवस्थेचे आशयाने स्वरूप या प्रकरणात दिले आहे.

शासनाची जबाबदारी

बहुतेक सर्व देशामध्ये आरोग्यसेवा ही कल्याणकारी शासनाची अंगभूत जबाबदारी मानली जाते. म्हणजेच सरकार स्वतःच आरोग्यसेवा चालवते किंवा सामाजिक विमा पद्धतीने आरोग्यसेवेची व्यवस्था करते. बहुतेक देशांमध्ये खाजगी वैद्यकीय सेवेला फारसा वाव नाही. अनेक देशांमध्ये शासन गोळा केलेल्या करांमधून काही टक्के खर्च आरोग्यसेवेवर खर्च होतो. यातून डॉक्टरांचा आणि कर्मचाऱ्यांचा पगार देऊन आरोग्यसेवा चालवल्या जातात. याला कर आधारित आरोग्यव्यवस्था म्हणता येईल.

Rajdhani
DATE / /

संदर्भ

वरील विषयाप्रमाणे या प्रोजेक्टमध्ये पिण्याचे स्वच्छ व शुद्ध पाणी व आरोग्यव्यवस्था

१) या प्रोजेक्टमध्ये पिण्याचे पाणी कसे स्वच्छ करावे व आरोग्यव्यवस्थापन कसे करावे यांचे स्पष्टीकरण दिले आहे.

२) पिण्याचे पाणी आणण्यासाठी नेहमी स्वच्छ भांडी वापरा. वीत दुरगेज विसळावे. पाणी भरताना चारपदरी फडक्याने गाळून घ्यावे. म्हणजेच पाण्याचे महत्व स्पष्ट केले आहे.

३) आरोग्याची काळजी कशी घ्यावी. आरोग्यव्यवस्थापना-च्या समस्या काय आहे. हे सांगितले आहे.

४) शहरामध्ये खेड्यामध्ये कोणत्या प्रकारची विषमता दिसून येते त्याचप्रमाणे आरोग्यव्यवस्थापनाचे महत्व सोप्या व सरळ भाषेत स्पष्ट केले आहे.

Rajdhani
DATE / /

प्रतिज्ञापत्र

मी कुमारी यतिका संजय परब द्वितीय वर्ष कला वर्ष 2020-21 स.का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय मालवण प्रतिज्ञापत्रक निवेदन करते की विषयाचा अभ्यास म्हणून सादर केलेला प्रकल्प अहवाल माझ्या स्वतःच्या शैक्षणिक अनुभावर आधारित असून या प्रकल्पाच्या माहितीचे संकलन मी स्वतः केलेले आहे.

स्थळ :

प्रकल्पक
नाव: यतिका संजय परब.
द्वितीय वर्ष

Rajdhani
DATE / /

ऋणनिर्देश

पिण्याचे स्वच्छ व शुद्ध पाणी आणि आरोग्य-व्यवस्थापन या विषयी साध्या सरळ भाषेत सांगितले आहे. हा प्रोजेक्ट महत्त्वाचा आहे. या विषयाची माहिती लिहिताना मोबाईलचा उपयोग करण्यात आला. पिण्याचे पाणी स्वच्छ का असावे व ते स्वच्छ सुद्धा कसे करावे पाठ्यपुस्तकामुळे काय उपयोग होतो. पाणी हे आपल्या जीवनासाठी उपयोगी आहे हे स्पष्ट केले आहे. पाण्यामुळे हे जग चालले आहे. त्याच प्रमाणे आरोग्यव्यवस्थापन हे कशा प्रकारे केले पाहिजे. आरोग्यसेवेपुढच्या कोणत्या समस्या आज देश. भरात उभ्या आहेत हे सुद्धा दिसून येते. शहरामध्ये त्याच्याप्रमाणे खेडगावामध्ये कोणत्या प्रकारची विषमता आहे हे सांगितले आहे. आरोग्यसेवेचे महत्त्व सुद्धा स्पष्ट केले आहे.

प्रत्येक देशाच्या जडणघडणीमध्ये शिक्षण व आरोग्य ही मानव विकासाची मुलभूत क्षेत्र आहे. गेल्या शतकात प्रत्येक देशामध्ये स्वतंत्र आरोग्यव्यवस्थापन तयार होत गेली. आरोग्यव्यवस्थापनामध्ये शासनाच्या कोण-कोणत्या जबाबदाऱ्या आहेत. हे सरळ व साध्या भाषेत स्पष्ट केले. ही सर्व माहिती मिळवण्यासाठी मी पुस्तकाचा व तसाच मोबाईल इंटरनेटचा वापर केला.

PAGE NO.:
DATE : / /

नाव: सायली देवू साळकर.

कॉलेजचे नाव:
स.का.पाटील महाविद्यालय,
मालवण.

विषयाचे नाव: फाऊंडेशन कोर्स: 2

वर्ग: S.Y.BSc क्रमांक: 08

मार्गदर्शक शिक्षिका:
सोनाली मसूरकर.

शैक्षणिक वर्ष: २०२० - २०२१.

PAGE NO.:

DATE : / /

हरित तंत्रज्ञान

PAGE NO.:
DATE : / /

SEMESTER : IV

PAGE NO.:
DATE: / /

अनुक्रमणिका

अनु क्र		पान नं
	उद्देश्ये	1
	प्रस्तावना	2
	हरित तंत्रज्ञान	3-5
	फायदे	6-7
	हरित तंत्रज्ञानाचा वापर	8-
	हरित तंत्रज्ञानामुळे कमी होणारे प्रमाण	9
	हवाई इंटरनेट	10-11
	दिशे प्रदूषणमुक्त रस्ते	12
	पर्यावरण होरण	13-14
	ऊर्जा व्यवस्थापन होरण	15-17

उद्दिष्टये

हरित तंत्रज्ञान म्हणजे काय ?
हरित तंत्रज्ञानाचे फायदे अभ्यासता येईल
त्यांचा वापर अभ्यासता येईल
हरित तंत्रज्ञानामुळे सरकारचे पर्यावरण होरण.
ऊर्जा व्यवस्थापन होरण अभ्यासता येईल.

Pratibha

प्रस्तावना

ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग म्हणजे तंत्रज्ञान होय. इम्यानुअल मेसथिन यांच्या मते "व्यावहारिक उपयोगासाठी मानवी ज्ञानाचा केलेला उपयोग म्हणजे तंत्रज्ञान होय. यात बुद्धी, अवजारे यंत्रणासामग्री, सामाजिक जीवन तसेच भौतिक वस्तू या सर्वांचा समावेश होतो." तंत्रज्ञान हा शब्द सर्वसाधारणपणे मानवी ज्ञानाचा व्यवहारिक आणि शास्त्रीय उद्देश्यपूर्तीसाठी केलेला उपयोग यासाठी वापरला जातो.

रॉबर्ट वॉटरसन यांच्यामते "तंत्रज्ञान म्हणजे विविध प्रक्रियेतील जाणीवपूर्वक केलेली निवड ज्यात वस्तू, पदार्थ ज्ञान आणि उपयुक्तता असते". तंत्रज्ञानामुळे उद्देश उपयुक्तता हा असतो. प्राप्त झालेल्या व्यावहारिक उपयोगासाठी कसा उपयोग करता येईल ते तंत्रज्ञान पहाते. तंत्रज्ञान ही काहीतरी उपयुक्त निर्माण करण्याची प्रक्रिया असून या प्रक्रियेत प्राप्त ज्ञानाचा व्यवहारिक उपयोग केला जातो.

हरित तंत्रज्ञान विषयक प्रगत संशोधनाच्या वापरामुळे तंत्राधिष्ठित मानव समाजाच्या अनेक समस्यांचे निराकरण होणार आहे. उदा. हरित तंत्राचा कृषी संशोधनात वापर करून पिकांच्या सुधारित, संकरित जाती तयार करताना. अशा संकरित बियाण्यांचा वापर करून अन्नधान्याचे उत्पादन व गुणवत्ता शतीत वाढ करता येतात. या तंत्राद्वारे प्रचंड वेगाने वाढणारी लोकसंख्या अन्नधान्याची गरज भागवता येईल असा शास्त्रज्ञांचा आत्मविश्वास असल्याने अन्नधान्यातून कोणाचा मृत्यू होणार नाही, असा दिलासा मानवजातीला मिळाला आहे.

Pratibha

हरित तंत्रज्ञान

ग्रीन टेक्नॉलॉजी हा शब्द गेल्या वीसेक वर्षांत खूप वापरात येऊ लागलाय. निसर्गनिर्मित ऊर्जा स्रोतांचा व निसर्गाचा ऱ्हास हाताबाहेर जातोय असं लक्षात आल्यावर आता सर्वांची पावलं ग्रीन टेक्नॉलॉजीकडे वळू लागली आहेत. हे काही नवं तंत्रज्ञान नाही तर निसर्गातील ऊर्जा स्रोतांची मदत घेऊन पर्यावरण व निसर्गावरील ताण कमी करण्यासाठीचं हे हरित तंत्रज्ञान.

आज भारतात जेवढं प्रदूषण आहे, त्यातील एक पंचमांश वाटा हा रस्त्यावरील प्रदूषणाचा आहे. सुमारे ४५० दशलक्षाहून जास्त वाहनं आज इथल्या रस्त्यांवर धावत आहेत. या प्रदूषणाचे परिणाम दिसत आहेतच. 2020-22 सालापर्यंत खाजगी वाहनांचा प्रवासासाठी वापर करणाऱ्यांची संख्या १३० कोटींवर जाईल तसंच वाहनांमधून हवेत सोडल्या जाणाऱ्या घातक कार्बनडायऑक्साईडचं प्रमाणही तोपर्यंत ९३.२५ दशलक्ष मेट्रिक टनवर पोहोचेल असा धक्कादायक निष्कर्ष लखनऊ आयआयएमच्या संशोधक विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यासातून मांडला आहे. ही परिस्थिती केवळ भारतातच नाही तर पूर्ण जगालाच प्रदूषणाचा विळखा पडलेला आहे. हे प्रदूषण आलं कुठून तर पेट्रोल, डिझेल, वीज अशा कृत्रिम ऊर्जा स्रोतांमधून, तसंच इतर घातक औद्योगिक रसायन व वायू उत्सर्जनातून व त्याच्या वापरातून. प्रदूषण व ऊर्जा स्रोतांचं नष्ट होणं हे आपल्या प्रगतीचे तर बायप्रॉडक्ट आहे. मानवी प्रगतीची झेप जशजशी पुढं जाते तसतसं निसर्ग व पर्यावरणाचा ताण वाढतोय. म्हणून हे दुष्परिणाम टळायचे असतील तर ग्रीन टेक्नॉलॉजी अर्थात पर्यावरणपूरक आधारित हरित तंत्रज्ञानाचा आधार घेण्याशिवाय पर्याय नाही.

Prabhat

ग्रीन टेक्नॉलॉजी बरेचदा क्लीन टेक्नॉलॉजी असं देखील म्हटलं जातं. कारण पर्यावरणावर आधारित तंत्रज्ञानाचा वापर करताना आपोआपच आपल्याकडून हवा, जमीन, पाणी हे महत्त्वाचे घटक शुद्ध ठेवले जातात व तसेच शुद्ध स्त्रोतांही आपल्या गरजेच्या कामांसाठी वापरले जातात. अशा प्रकारे नैसर्गिक स्त्रोतांना अबाधित ठेवून पर्यावरणाची हानी होणार नाही याची काळजी घेण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाला हरित तंत्रज्ञान म्हणतात.

हवा, पाणी, माती, अन्नपदार्थ, पर्यावरण शुद्ध ठेवणाऱ्या हरित तंत्रज्ञानाचे फायदे आता बहुतेकांना पडू लागले आहेत. त्यामुळे जगभरातील अनेक उद्योगधंद्यांना आता पर्यावरणाधारित तंत्रज्ञानाचा वापर वाढताना दिसतो आहे. औद्योगिक व तांत्रिक प्रगतीला कवेत घेण्याच्या जोशात निसर्ग व पर्यावरणावर तसंच आपण सजीवांवरही झालेल्या दुष्परिणामांची तीव्रता कमी करणं या तंत्रज्ञानातील काही उपायांच्या सद्यस्थिती अवश्य आहे. म्हणून प्रदूषण वाढविण्यासाठी व कृत्रिम ऊर्जास्त्रोतांच्या भरमसाठ वापर करणाऱ्या उद्योगक्षेत्रातील कंपन्याकडून हरित तंत्रज्ञानाचा वापर होताना दिसतो आहे. खरं तर वाढत्या जागतिक तापमानामुळं अनेकांचे लक्ष या तंत्रज्ञानामुळे वापराकडे वळलं. पर्यावरणावर आधारित तंत्रज्ञानाचा वापर करण्यातच शहाणपणा असल्याचं आज भारत, युरोप, अमेरिका, जपान, चीन, रशियासह अनेक देशांना कळून चुकल आहे. आजवर पर्यावरणाचा नाश केल्यामुळे ऊर्जास्त्रोतांचा नाश तर झालाय शिवाय त्याचे आर्थिक, सामाजिक दुष्परिणामही अनेक देशांना दिसले. पण हे टाळण्यासाठी पर्यावरणामधील हरित तंत्रज्ञानाचा वापर म्हणजे नेमकं काय करायला हवं? तर यात रिसायकल, रियुज, रिन्यु, रेड्युस, रिकव्हर या पाच तत्वांचा प्रामुख्याने वापर होतो. रिसायकल, व रियुज म्हणजे पुनर्वापर यात काही वस्तू या तशाच्या तशा पुन्हा वापरात आणता येतात. तर काही त्यावर प्रक्रिया करून

Pratibha

रिन्यू म्हणजे रिन्यूएबल एनर्जी, ज्यात काही ऊर्जास्त्रोतांना पुनर्वापरात आणलं जातं. यात सौरऊर्जा, बायोमास, औष्णिक, पवनऊर्जा, भूऔष्णिक ऊर्जास्त्रोत येतात. रेड्युस म्हणजे नैसर्गिक व कृत्रिम ऊर्जास्त्रोतांचा कमीत कमी वापर करून प्रदूषण, कचरा कमी करणं व निसर्गावरचा ताण कमी करून ऊर्जा बचत करणे.

रिकव्हरींग एनर्जी म्हणजे ज्यात पाणी, उष्णता अशा प्रकारच्या ऊर्जा स्त्रोतांचा पुन्हा वापर करता येणं शक्य असते.

हरित तंत्रज्ञान त्याचे फायदे

- आजकाल हॉटेल, ऑटोमोबाईल, ऊर्जानिर्मिती, बांधकाम आयटी, कृषी, वस्त्रोद्योग अशा कित्येक क्षेत्रांमध्ये पर्यावरणावर आधारित हरित तंत्रज्ञानाचा वापर होत आहे.

- डेन्मार्कमधील एका हॉटेलात ग्राहकांना स्टेशनरी पेडल बाईक चालवायला लावून विद्युत ऊर्जा निर्माण केली जाते तेव्हा त्या बदल्यात त्यांना एक वेळ मोफत जेवण दिलं जाते.

- अशा तऱ्हेने सेवा क्षेत्रातील ग्राहकांना हरित तंत्रज्ञानाचं महत्व पटवून देता येऊ शकते.

- अनेक हॉटेल्समध्ये व घरांमध्ये आज फोटो सेन्सवर चालणारे लाईटस् बनवलेले असतात. आज जगातील कित्येक नागरिकांनी झीरो वाष्रेज जीवनप्रणाली स्वीकारलेली आहे.

- परदेशातील अनेक इमारतींची वीज ही त्यांच्या कडे असलेल्या सौरऊर्जा पॅनेल्समधून निर्माण केली जाते.

- अनेक कार कंपन्यानी प्रदूषण कमी करणाऱ्या इलेक्ट्रिक कार बाजारात आणलेल्या आहेत.

Pratibha

- औद्योगिक क्षेत्रातील अनेक कंपन्या कार्बन फूटप्रिंट म्हणजे त्याच्या प्रदूषणातील वाटा कमी करण्यावर भर देतात.

- जीपीएस, वायरलेस सिस्टम, ब्रॉडबँड, रेडिओ फ्रिक्वेन्सी, इंटरनेट अशा काही साधनांमुळे हे हरित तंत्रज्ञान अद्ययावत करण्यासाठी मदत होते.

- साधं आपल्या घरातील उदाहरण घेतलं तर आपण एनर्जी एफिशिएंट उत्पादन वापरून या हरित तंत्रज्ञानाला हातभार लावू शकतो.

- कंपन्यादेखील क्लीन कॉम्प्युटिंग राबवून सहाय्य करू शकतात. यात कॉम्प्युटर व नेटवर्किंगसाठी ऊर्जाबचत करणारी उपकरणं वापरणं, कॉम्प्युटर्स किंवा लॅपटॉपची पर्यावरणाच्या नियमांनुसार विल्हेवाट लावणं इत्यादी उपाय येतात.

- आज देशात सेरी, टाटा ग्रुप, ऑर्किड हॉस्पिटलसारख्या अनेक संस्था हरित तंत्रज्ञानाचा प्रसार व प्रचार करत आहेत.

- आपणही आपल्या परीने पर्यावरणाला वाचवणाऱ्या या तंत्रज्ञानाचा आपल्या फायद्यासाठी व पर्यायाने मानवजातीच्या भविष्यासाठी वापर सुरू झाला.

Pratibha

हरित तंत्रज्ञानाचा वापर

सौरऊर्जा, औष्णिक ऊर्जा, पवनऊर्जा इत्यादींचा वापर

सीएफएल, लेड लाईट

फोटो सेन्सरवर चालणारे लाईटस्

पाण्याचा व उष्णतेचा पुनर्वापर

रेन वॉटर हार्वेस्टिंग

कागदाचा पुर्नवापर

ग्रीन कॉम्प्युटिंग

जलसिंचन

जैवविघटन होणारा वस्तूंचा वापर

इको फ्रेंडली घरं व वस्तू

हरित तंत्रज्ञानामुळे कमी होणारे प्रमाण

ग्लोबल वॉर्मिंग

कार्बन फूटप्रिंट

नैसर्गिक ऊर्जास्त्रोतांचा वापर

कृत्रिम ऊर्जास्त्रोतांचा वापर

जंगलाची हानी

वास्तूकीवर ताण

उत्पादन खर्च

घातक वायूचं वाढतं उत्सर्जन

हवा, पाणी, जमिन, शेती यातील प्रदूषण

घातक कचरा

Pratibha

हवाई इंटरनेट

सध्या ऑस्ट्रेलियाच्या आकाशात बरेच दिवस तरंगणारे काही रंगीत फुगे सर्वांचे आकर्षण ठरले आहे. सर्च इंजिन कंपनी गुगल नं टेलिस्ट्रा या टेलिकम्युनिकेशन क्षेत्रातील ऑस्ट्रेलियन कंपनीच्या सहाय्याने इंटरनेट क्षेत्रात एक क्रांतीकारी पाऊल टाकलय. हवेत तरंगणाऱ्या फुग्यांमधून वायफाय सिग्नलद्वारे इंटरनेट सेवा देण्याचा महत्त्वाकांक्षी व अनोखा उपक्रम गुगलनं हाती घेतलाय.

गेल्याच आठवड्यात 20 फुगे सोडून या प्रोजेक्टची प्रायोगिक तत्त्वावरील चाचणी क्वीन्सलँड इथं घेण्यात आली. आकाशात प्रवासी विमानांच्या मार्गाक्रमणाच्या उंचीवर हे वायफाय फुगे तरंगत आहेत. या फुग्यांच कार्य सौरऊर्जेमुळे चालतं.

टेलेस्ट्रा कंपनीनं गुगलशी भागीदारी करून त्यांना स्वतःचे टिबोरा स्टेशनमधून फुग्यांकडे वायफाय सिग्नल पोहोचतो. स्टेशन व 2.6 गिगाहर्ट्झ स्पेक्ट्रम देऊ केलाय. व तिथून तो जमिनीवरील साइटपर्यंत पोहोचतो. त्याच्या सिग्नलची रेंज मोठी राहणार आहे त्यामुळे जमिनीवर मोठ्या प्रदेशाला याद्वारे इंटरनेट सेवा मिळवता येईल. जगातील दोन तृतीयांश भागात आज ही इंटरनेट सेवा उपलब्ध नाही.

काही भाग अत्यंत दुर्गम ठिकाणी असल्यामुळे तिथं इंटरनेट सेवा पोहोचणं कठीण असतं. काही ठिकाणी नैसर्गिक आपत्तीमुळे इंटरनेट सेवा कोलमंडून पडते. अशा गरीब व संकटात असलेल्या देशांमध्ये फुग्यांमार्फत इंटरनेट सेवा देण्याचा यापाठी गुगलचा उद्देश आहे. अशा गरीब व संकटात असलेल्या देशांमध्ये फुग्यांमार्फत इंटरनेट सेवा देण्याचा यापाठी गुगलचा उद्देश्य आहे.

Pratibha

सध्यातरी हा प्रयोग किती यशस्वी होईल. याबाबत दोन्ही कंपन्यांनी काही भाष्य केलेलं नाहीये परंतु हा प्रयोग यशस्वी झाला तर भुयारी केबल टाकण्याचा खर्च प्रचंड प्रमाणात वाचणार आहे. तसंच इंटरनेट सेवा देणाऱ्या कंपन्यांना त्यांच्या नेटवर्कचाही विस्तार जास्त प्रमाणात करता येणार आहे. सध्या फक्त १०० दिवस हे फुगे ह्वेत तरंगू शकतात. त्यांना कायमचं ह्वेत कसं टिकवता येईल या दृष्टिने गुगलचे प्रयत्न सुरू आहेत. तसंच विमानाच्या सेवेत व वीज-पुरवठ्यात कोणीतरी अडचण येणार नाही हे देखील त्यांना पाहावं लागणार आहे. भविष्यात गुगल हे फुगे इंटरनेट सेवा देणाऱ्या कंपन्यांना भाडेतत्त्वांवर देणार आहे. लवकरच फेसबुक देखील अशा प्रकारचा प्रयोग करून पाहणार आहे. अशी बातमी आहे. मात्र त्यासाठी सौरऊर्जेवर, चालणारे ड्रोन्स वापरण्यात येणार आहेत. थोडक्यात, गुगल, टेलेस्ट्रा व फेसबुकसारख्या नामवंत कंपन्यांनाही पर्यावरणाधारित तंत्रज्ञानाचं महत्त्व पटलंय दिसतेयं.

हिरवे प्रदूषणमुक्त रस्ते

घरातल्या झाडांच्या कुंड्यामध्ये वाढणारं अगदी तलम वाटणार हिरवं गवती आच्छादन पाहिलं आहेत कधी? त्यालाच मॉस असंही म्हणतात. हे मृदू तण झाडांसाठी चांगलं असतं, तसंच ते प्रदूषण कमी करण्यासाठी देखील उपयोगी पडतं असा शोध आता शास्त्रज्ञांनी लावला आहे.

ही वनस्पती सुर्यप्रकाश व कार्बन-डायऑक्साइडवर वाढते व भरपूर प्रमाणात ऑक्सिजन बाहेर सोडते. यातील काही मॉस किंवा हिरवं तण हे माणसासाठी हानीकारक देखील असू शकतं, जे शरीरात गेल्यावर मेंदूच नुकसान करतं. परंतु काही तण हे उपयोगी असतात, त्याच्यापासून खाद्य व जैवइंधनही तयार करता येतात. अशाच प्रकारचं उपकारक मॉस वापरून रस्त्यावरील प्रदूषण कमी करण्याचा प्रयोग स्वित्झर्लंडमधील डिझायनर संशोधकांनी केलाय.

आंतरराष्ट्रीय डिझाईन ग्रुप क्लाऊड क्लेयरिव्हच्या डच व फ्रेंच डिझायनर्सनी हे ऑक्सिजन बाहेर सोडणार हिरवगार तण वापरण्यासाठी रस्त्यांची विशेष आखणी केली. याला डिझायनर अर्बन फार्मिंगही म्हटलं जातं. ट्यूब्स, पंप, फिल्टर, व सोलर पॅनेल्सच्या सहाय्याने ही वनस्पती वाढवली गेली. स्वित्झर्लंडच्या एका ओव्हरपास ब्रीजवर ही वनस्पती ठेवण्यात आली आहे. त्यानंतर तिथलं वाहनांमुळे होणार प्रदूषण कमी झाल्याचं समजून आलं. म्हणजे अखेर मानवनिर्मित प्रदूषण कमी करण्यासाठी आपल्याला वनस्पतींचीच मदत घ्यावी लागणार आहे.

Pratibha

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन

मुंबईमध्ये पर्यावरण पूरक, आरामदायी आणि त्वरित कमी ऊर्जा वापरणारी वाहतूक प्रणाली उपलब्ध करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन कटिबद्ध आहे.

पर्यावरण धोरण

पर्यावरण रक्षणाचे महत्व मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला ठाऊक आहे. त्यानुसार पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ती सर्व धोरणे आणि उपायांचा अवलंब संस्थेतर्फे करण्यात येईल.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन यासाठी प्रयत्नशील असेल:

- मार्गिकेतील सध्याच्या हरित पट्ट्याला पूरक पट्टा तयार करणे.
- संसाधनांचा कार्यक्षम वापर करून शहरात पर्यावरण पूरक वाहतूक निर्माण करणे व उत्सर्जन आणि कचरा कमी करणे.
- भागधारकांमध्ये पर्यावरणीय उद्दिष्टयांच्या बाबत जागरूकता निर्माण करणे व प्रशिक्षण देणे तसेच पर्यावरण रक्षण प्रक्रिया, प्रकल्प अंमलबजावणी मध्ये व नंतरच्या टप्प्यांमध्ये समाविष्ट करणे.

Pratibha

- पर्यावरणीय अधिनियमांचे, नियमनाचे व आपल्याला मान्य असलेल्या इतर पर्यावरणीय उपक्रमांचे पालन करणे.

- आपल्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या पर्यावरणीय उपक्रमांना प्रोत्साहित करून एक सक्षम आणि पर्यावरणासंदर्भात जागरूक संस्कृती तयार करणे.

- आवर्ती लाभांकरिता ऑपरेशन कार्यकिलापमध्ये ऊर्जा कार्यक्षम पद्धतीचा जास्तीत जास्त वापर करणे.

- कंत्राटदार व उपकंत्राटदार सदर धोरणाचे पालन करतील याची काळजी घेणे.

- मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन आपली पर्यावरणीय कामगिरी सतत उंचावत राहील व शाश्वत विकास घडविण्यासाठीची कटिबद्धता दर्शविणाऱ्या पद्धतीने आपले उपक्रम सुरू ठेवील.

ऊर्जा व्यवस्थापन धोरण

पर्यावरण रक्षण ही अत्यंत महत्त्वपूर्ण गोष्ट असल्याची जाणीव एमएमआरसी ला आहे. त्यामुळेच कार्यक्रमाने बंधनकारक असेल किंवा नसले तरीही पर्यावरण रक्षणासाठी आवश्यक ती सर्व काळजी, एमएमआरसी आपली प्रणाली राबवताना घेईल.

त्यानुसार ह्या उपक्रमांचा पाठपुरावा म्हणून संस्था तिच्या प्रकल्पामध्ये ऊर्जेचा अनुकूल वापर करण्यासाठी खालील प्रमाणे प्रयत्न करील:

- जगातील सर्वोत्तम मेट्रो सेवांच्या बरोबरीने मुंबई मेट्रो सेवेचे मापदंड आखून घेईल.
- आरेखनापासून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सर्वाधिक फायदे मिळविण्याचा संस्थेचा प्रयत्न राहील.
- आवर्ती लाभाकरिता ऑपरेशन स्थिती दरम्यान ऊर्जा कार्यक्षम पद्धतीने प्रोत्साहन देणे
- योग्य ते नियोजन करून ऊर्जेचा वापर कमी करण्याकरिता खालीलप्रमाणे प्रयत्न करणे:
- अनुकूल लाभांसाठी आरेखन स्थिती पासूनच ऊर्जाक्षम तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल.
- प्रवाशांच्या गरजेनुसार गाड्यांचे नियोजन करण्यात येईल.

Pratibha

- एलईडी सारखी ऊर्जाक्षम स्मार्ट प्रकाश योजना, अनुकूल वातानुकूलन पद्धती, फलाटांसाठी संरक्षक दरवाजे, स्मार्ट फ्लक्स सॉक्युपन्सी सेंसर इत्यादींचा वापर करून पर्यावरण पूरक मेट्रो स्थानके आरेखित करण्यात येतील.
- इमारती मधील ऊर्जा वापर कमी करण्यासाठी स्थानकांचे अनुकूल आरेखन करण्यात येतील.
- प्रवाशांच्या गर्दीच्या प्रमाणाशी मेळ खाणारे मंद प्रकाश तंत्रज्ञान वापरून अनावश्यक दिवे बंद/ मंद ठेवण्यात येतील.
- स्थानक/ आगाराच्या प्रकाश योजनेला पूरक म्हणून नैसर्गिक उजेडाचा वापर करण्यात येईल.
- ऊर्जाक्षम इंजिने व रेल्वेचे डबे तसेच उर्जेची पुनर्निर्मिती करणाऱ्या ब्रेकिंग यंत्रणेचा वापर करण्यात येईल.
- स्थानकांवर उद्वाहक / सरकते जिने यांची तरतूद करण्यात येईल.
- स्थानक/ आगारामध्ये सौर ऊर्जा, जल संवर्धन व स्मार्ट प्रकाश योजना यांना प्रोत्साहन देण्यात येईल.
- आवश्यकतेनुसार गाड्यांचा स्थानकांवर थांबण्याचा कालावधी कमी करण्यात येईल व कमी गर्दीच्या वेळेस ऊर्जेची बचत करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.
- नियमित परीक्षण करून परिचालनामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात येईल.

Pratibha

- प्रयोगशाळांच्या संख्येनुसार इमारतीच्या आतील वातानुकुलन कमी- जास्त करण्यात येईल.
- कर्मचाऱ्यांमध्ये ऊर्जा बचतीबाबत सतत जागरूकता निर्माण करण्यात येईल.
- ऊर्जेच्या अनुकुल वापरासाठी दीर्घ मुदतीची कार्ययोजना करून इंधनांवरील अवलंबित्व कमी करण्यात येईल.
- सौर ऊर्जेच्या मदतीने नॉन इग्निशन / कार डेपोसाठी ऊर्जा वापर कमी करण्याचा प्रयत्न केला जाईल.

Prabhat

हरितक्रांती

भारतात हा शेतीप्रधान देश आहे परंतु भारतीय कृषी तंत्रज्ञान अतिशय मागास होते. १९७० मध्ये भारत पाकिस्तानची फाळणी झाली. त्यात भारताच्या वाटेला ८२% लोकसंख्या ७५% लागवडीखालील क्षेत्र व ६९% बागायत क्षेत्र आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारताला शेतीप्रधान देश असून ही PL४८० करारानुसार १९५५ मध्ये अमेरिकेकडून गहू आयात करावा लागला.

इ.स. १९६० च्या दशकात शेतकी संशोधन, विकास, तंत्रज्ञानाच्या मदतीने भारतात कृषिउत्पादन वाढले. हा काळ भारतातील हरितक्रांती म्हणून ओळखला जातो. त्यांच्या सहकार्याने जास्त उत्पन्न देणारे जातींची बियाणांचा विकास, सिंचनाच्या पद्धतीने विस्तार, व्यवस्थापनाचे आधुनिकीकरण, संकरित बियाणांचे, कृत्रिम खतांचे व कीटकनाशकांचे वितरण इत्यादी मार्गावर यात भर देण्यात आला. भारताच्या कृषिमंत्रालयाचे तत्कालीन खलागार एम.एस. स्वामिनाथन यांनी डॉ. नॉर्मन बोरलॉगांना भारतात बोलावले. अमेरिकेतील फोर्ड फाऊंडेशन आणि भारती केंद्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नातून मेक्सिकोमधील आंतरराष्ट्रीय मका व गहू विकास केंद्रातून गव्हाचे बियाणे आयात करण्यात आले. पाण्याची सुलभक उपलब्धता व शेतकीची सफल पार्श्वभूमी यांमुळे भारतीय केंद्रशासनाने नवी पिकांच्या प्रयोगांसाठी पंजाबची निवड केली. अधिक उत्पन्न देणारी बियाणी व जलसिंचनाच्या वाढत्या वापरद्वारे भारतातील अन्नधान्याचे उत्पन्न वाढले. मात्र कालौघात रासायनिक खते व कीटकनाशके यांच्या अतिरिक्त वापरांमुळे शेतजमिनीवर विपरीत परिणाम झाले.

PAGE NO.:
DATE: / /

संदर्भ सूची

1) पाठ्यभूत अभ्यास - II पुस्तक
2) हरित तंत्रज्ञान आधारित पुस्तक
3) www. Harit tantradyan.com Pdf
4) www. google. com.

Pratibha

मुंबई विद्यापीठ

स. का. पाटील. सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवण

विद्यार्थिनिचे नाव :- कु. लिंक्सी बरस्थाव फर्नांडीस

वर्ग :- S.Y.B.Com

विषय :- पायाभूत अभ्यास

हजेरी क्र. :- 44

प्रकल्पाचे नाव :- कोविड-19-चा शिक्षणा-वर झालेला परिणाम

मार्गदर्शक शिक्षकाचे नाव :- Prof. B.H. Chaugule.

शैक्षणिक वर्ष :- 2020-21

परिक्षा क्र :-

कोविड 19 चा शिक्षणावर झालेला परिणाम

प्रस्तावना

कोविड-19 म्हणजेच [कोरोना] ~~चा~~ शिक्षणावर फार मोठा गंभीर परिणाम झालेला आपल्याला दिसून येतो. अनेक ठिकाणी ऑनलाईनकडे वळत होणं आमच्यासाठी सोप ठरल. लॉकडाऊन जाहिर केल्यानंतर लगेच आम्ही ऑनलाईनकडे वळलो. जवळपास सगळे वर्ग गुगल मीट किंवा झूमवर घेतले जात होते. दिल्लीतल्या अशोका युनिव्हर्सिटीतील प्राध्यापक सैकत मजूमदार सांगतात.

पण असं असल तरी विद्यापीठात काही विद्यार्थी असे आहेत, ज्यांना इंटरनेट कनेक्शनविषयी समस्या आहेत. यामध्ये काश्मीर आणि इतर दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

देशातील अनेक खासगी शाळांनी आता झूम ॲपवर वर्ग घेण्यास सुरुवात केली आहे. पण, ही फक्त तात्पुरती सोय आहे. असं अनेक पालकांचं म्हणणं आहे.

अनेक पालकांना या पद्धतीसाठी आवश्यक असे ऑनलाइन साहित्य मिळविणेही दुरापास्त होईल आणि त्याचा अंतिम परिणाम विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनावर होईल. त्यामुळे कमी उत्पन्न असणाऱ्या तसेच डिजिटली गरीब असलेल्या कुटुंबातील मुले मागे पडतील.

गरज आणि महत्त्व

1] कोरोनामुळे अनेकदा अनेक कुटुंबांमध्ये काही प्रमाणात अशा काही कमतरता असतात की ज्यांमुळे शिक्षणाचे स्वरूप कसेही असो, त्या कमतरतांमध्ये बदल करता येतच नाही.

2] कोरोनामुळे शाळा-कॉलेजेच कधी व कशाप्रकारे सुरू होणार आहेत असे प्रश्न शिक्षकांच्या समोर आहेतच. त्याचप्रमाणे हे प्रश्न पालकांच्याही समोर आहेत.

3] कोरोना काळात शाळा-कॉलेजेस बंद असल्याने त्यांना ऑनलाईन शिक्षण सुरू असल्याने मुलांच्या डोक्यांवर मोठ्या प्रमाणात गंभीर परिणाम झालेला आपल्यास पहायला मिळतो.

4] कोरोनाच्या काळात मुलांचे ऑनलाईन शिक्षण सुरू असल्या कारणाने ज्या भागात इंटरनेटची सुविधा नसल्या कारणाने त्यांना शिक्षण घेण्यास फार मोठा त्रास सहन करताना आपल्याला पाहायला मिळतो.

माहितीचे सादरीकरण

कोरोनाचा शिक्षणावर होणारा परिणाम :-

कोविड-१९ चा उच्च शिक्षणावर दूरगामी परिणाम झाला आहे. इंजिनिअरिंग व आर्किटेक्चरसाठी प्रवेश परिक्षेस उशीर झाला आहे. प्रवेश परिक्षा न झाल्यास किंवा त्यास विलंब झाल्यास विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी लागणारी शैक्षणिक पात्रता आणि या संदर्भात शासकीय निर्णयांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्णय होण्याची शक्यता आहे. तसेच नोकरी गमावणे, वेतन कपात, टाळेबंदी, सेक्टर बंद होणे याचा देय क्षमतेवर परिणाम होईल. आर्थिक क्षमता कमी झाल्यामुळे शैक्षणिक कर्ज घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढू शकते.

विद्यार्थी आणि पालक कमी शुल्क अभ्यासक्रम, अल्प मुदतीचा अभ्यासक्रम आणि ऑनलाईन शिक्षण याकडे गतिमान ई-स्किलिंग पर्याय म्हणून अधिक लक्ष देऊ शकतात. शहराबाहेरील विद्यार्थ्यांना असलेल्या कोरोनाच्या धोक्यामुळे आणि न परवडणारे विकल्प असल्याने हॉस्टेलमधील प्रवेश कमी होऊ शकतात. पालक त्यांच्या मुलांना घरी राहून स्थानिक पातळीवर शिक्षण देण्यास प्राधान्य देतील. प्लेसमेंट मध्ये मोठी पोकळी जाणवेल, परंतु विनामूल्य इंटर्नशिप वाढू शकते.

1] सकारात्मक बाजू पाहिल्यास मास्टर्ससाठी परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होऊ शकते आणि ते स्थानिक पातळीवर पर्याय पाहू शकतात. ज्येष्ठ विद्यार्थी जे कदाचित नोकरी गमावू शकतात, ते शॉर्ट टर्म ई-स्किलिंग कोर्सेस शोधू शकतात.

2] नवनवीन तंत्रज्ञान उदयास येईल आणि अशा प्रकारे या तंत्रज्ञानामधील अभ्यासक्रमांची मागणी लक्षणीयरित्या वाढू शकेल. हे अभ्यासक्रम आपल्या संस्थेत चालविण्यासाठी ती सुसज्ज असणे ही भविष्यातील निकड गरज आहे. अशा कौशल्य-आधारित अभ्यासक्रम चालविणारी संस्था आणि विद्यापीठ [उदा- सिम्बायोसिस स्किल्स युनिव्हर्सिटीस] भविष्यातील या बदलास सामोरे जाण्यासाठी, तसेच

पालक, विद्यार्थी व समाजाची ही मागणी पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात तयारी दर्शवित आहे.

शिक्षण क्षेत्रावर दूरगामी परिणाम करणारा निर्णय :-

राज्याच्या शालेय शिक्षण खात्याने २८ ऑगस्ट रोजी शासन निर्णय [जीआर] जारी केला. शिक्षकांच्या आणि संस्थाचालकांच्या संघटनांनी 'काला जीआर' म्हणून त्याचा निषेध केला संघटनांच्या मते या निर्णयामुळे राज्याच्या शालेय शिक्षण व्यवस्थेवर दूरगामी विपरीत परिणाम होणार आहेत, तर शासनाच्या मते हा निर्णय 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार-२००९' या कायद्यात चपखल बसत असून यामुळे संस्थाचालकांच्या गैरव्यवहारांना चाप बसण्याचा या वादग्रस्त निर्णयाची मीमांसा करणारा लेख.

कोरोना आणि त्यामुळे आलेल्या टाळेबंदीमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. कोरोनानंतरच्या काळात शाळा कशा असतील, याची चर्चा आता विविध व्यासपीठांवरून घडत आहे. त्यात प्रामुख्याने ऑनलाईन शिक्षण या मुद्दयावर भर आहे. पण त्यापाठोपाठ असेही प्रश्न उपस्थित होत आहेत की, या चर्चेची एवढी घाई कशाला? अशा व्यवस्थेसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा आपल्याकडे आहेत का? लहान मुलांना मोकळे का सोडले जात नाही? इत्यादी. इत्यादी.

कोविड-19 ने सर्वच क्षेत्रांपुढे काही मूलभूत प्रश्न उभे केले आहेत. त्यास शैक्षणिक क्षेत्रही अपवाद नाही. कोरोनानंतरच्या काळात शैक्षणिक व सत्ते सुरक्षित सुरू करण्याबरोबरच मुलांनाही सुरक्षित ठेवण्यावर भर दिला जात आहे. या पार्श्वभूमीवर ऑनलाइन शिक्षणावर भर दिला जात आहे. आपण हे तंत्रज्ञान आत्मसात करायला हवे, अशा आशयाच्या चर्चा सुरू आहेत. या सर्व गोष्टींचा उहापोह करण्याची हीच वेळ आहे. पण, प्रत्यक्ष वर्गात बसून घेतले जाणारे शिक्षण ते ऑनलाइन शिक्षण हा एवढा

मोठा बदल स्वीकारण्याची मानसिकता आपल्याकडच्या पालकांकडे आहे का?

मुलांचे लक्ष एकाच गोष्टीकडे गुंतवणे ही महाकठीण गोष्ट. विद्यार्थी शाळेत मित्र, शिक्षक, शाळेचे वातावरण या कारणांमुळे तरी मुले काही प्रमाणात का होईना अभ्यासाकडे लक्ष देतात. घरात मात्र या सर्व वातावरणाचा अभाव असल्याने 'घरून शिक्षण' [लर्न फ्रॉम होम] या संकल्पनेचं काय होईल, ती यशस्वी ठरेल का, अशा शंका उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

ऑनलाइन शिक्षण सर्वांना कसे झेपणार?

प्रत्यक्ष वर्गात बसून घेतले जाणारे ~~शिक्षण~~ शिक्षण ते ऑनलाइन शिक्षण हा एवढा मोठा बदल स्वीकारण्याची मानसिकता आणि क्षमता आपल्याकडच्या पालकांकडे आहे का?

कोरोना आणि त्यामुळे आलेल्या टाळेबंदीमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. कोरोनानंतरच्या काळात शाळा कशा असतील याची चर्चा आता विविध व्यासपीठांवरून घडत आहे. त्यात प्रामुख्याने ऑनलाइन शिक्षण या मुद्द्यावर भर आहे. पण त्यापाठोपाठ असेही प्रश्न उपस्थित होत आहेत की, या चर्चेची एवढी घाई कशाला? अशा ऑनलाईन मंचांची खरोखर गरज आहे का? अशा व्यवस्थेसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा आपल्याकडे आहेत का? लहान मुलांना मोकळे का सोडले जात नाही? इत्यादी. इत्यादी.

कोविड 19 ने सर्वच क्षेत्रांपुढे काही मूलभूत प्रश्न उभे केले आहेत. त्यास शैक्षणिक क्षेत्रही अपवाद नाही. कोरोनानंतरच्या काळात शैक्षणिक सत्रे सुरळीत सुरू करण्याबरोबरच मुलांनाही सुरक्षित ठेवण्यावर भर दिला जात आहे. या पार्श्वभूमीवर ऑनलाइन शिक्षणावर भर दिला जात आहे. आपण हे तंत्रज्ञान

आत्मसात करायला हवे, अशा आशयाच्या चर्चा सुरू आहेत. या सर्व गोष्टींचा उहापोह करण्याची हीच वेळ आहे. पण प्रत्यक्ष वर्गात बसून घेतले जाणारे शिक्षण ते ऑनलाइन शिक्षण हा एवढा मोठा बदल स्वीकारण्याची मानसिकता आपल्याकडच्या पालकांकडे आहे का ?

मुलांचे लक्ष एकाच गोष्टीकडे गुंतवणे ही महाकठीण गोष्ट. निदान शाळेत मित्र, शिक्षक, शाळेचे वातावरण या कारणांमुळे तरी मुले काही प्रमाणात का होईना अभ्यासाकडे लक्ष देतात. घरात मात्र या सर्व वातावरणाचा अभाव असल्याने 'घरून शिक्षण' [लर्न फ्रॉम होम] या संकल्पनेचं काय होईल, ती यशस्वी ठरेल का, अशा शंका उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

लहान मुलांना एखादी गोष्ट करण्यापासून जेवढे तुम्ही रोखाल तेवढे ते आणखी हट्टाने तीच कृती करतात. मोबाईलचेच उदाहरण घ्या. ना. मोबाईल घेऊ नको. असं कितीही बजावून सांगितले तरी ते या ना त्या कारणाने मोबाइल डोळ्यासमोर धरतातच. याला सध्याच्या परिभाषेत 'स्क्रीन टाइम' असे म्हटले जाते. स्मार्टफोन आणि स्क्रीन यांच्यापासून लहान मुलांना फार काळ दूर ठेवणे शक्य होत नाही. टाळेबंदीमुळे घरात अडकून पडलेल्या लहानग्यांना या स्क्रीन टाइमपासून कसं झरकरवायचे हा मोठा प्रश्न पालकांसमोर उभा आहे.

कोरोनाचा शिक्षणावर परिणाम :-

कोविड-१९ चा उच्च शिक्षणावर दूरगामी परिणाम होणार आहे. इंजिनिअरिंग व आर्किटेक्चरसाठी प्रवेश परिक्षेस उशीर होणार आहे. प्रवेश परिक्षा न झाल्यास किंवा त्यास विलंब झाल्यास विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागणारी शैक्षणिक पात्रता आणि या संदर्भात शासकीय निर्णयांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच,

नोकरी गमावणे, वेतन कपात, टाळेबंदी, सेक्टर बंद होणे, याचा देय क्षमतेवर परिणाम होईल. आर्थिक क्षमता कमी झाल्यामुळे शैक्षणिक कर्ज घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढू शकते.

कोरोना व्हायरसच्या [COVID-19] जागतिक साथीमध्ये एकमेकांच्या संपर्कात राहण्यासाठी WhatsApp ची कशी मदत होते ते पहा :-

WhatsAPP तुम्हाला तुमच्या प्रियजनांच्या संपर्कात राहण्यास मदत करते. मित्रमंडळी आणि कुटुंबीय यांच्या कायम संपर्कात राहण्यासाठी, आरोग्य सुरक्षेविषयी प्रसारित केलेली अधिकृत माहिती जाणून घेण्यासाठी आणि माहिती जबाबदारीने शेअर करण्यासाठी तुम्ही खालील पद्धती वापरू शकता. तुम्ही WhatsAPP चे नवीन वापरकर्ते असल्यास किंवा थोडी अजूनही करायची असल्यास, सुरुवात कशी करायची यांची ही मार्गदर्शिका आहे.

कोरोना व्हायरस हा विषाणूंचा एक गट आहे. या व्हायरसमुळे सस्तन प्राण्यांना आणि पक्ष्यांना विविध रोग होतात. यांत गायींना व डुकरांना होणाऱ्या अतिसाराचा आणि कोंबड्यांना होणाऱ्या श्वसन रोगाचा समावेश आहे. या विषाणूचा प्रसार मानवांमध्ये श्वसन संसर्गाने होतो. हे संसर्ग बऱ्याचदा सौम्य, परंतु संभाव्य प्राणघातक असतात. कोरोना व्हायरसचा प्रतिबंध करणारी लस किंवा रोग झाल्यास द्यायची अँटिव्हायरल औषधे अजूनही [2020 साल] उपलब्ध नाहीत.

कोरोनामुळे शिक्षणात सावळा गोंधळ, विद्यार्थी अध्यापनापासून दूर :-

माणसाच्या मूलभूत गरजांपैकी शिक्षण ही एक मूलभूत गरज आहे. 21 व्या शतकात. शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. कोरोना विषाणूचा सर्वात जास्त परिणाम याच शिक्षण क्षेत्रावर झालेला पहायला मिळतो. त्या अनुषंगाने राज्य शासनाकडून शाळा बंद पण शिक्षण सुरू ही मोहीम हाती घेण्यात आली. ज्या अंतर्गत विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण देण्याचे धोरण आखण्यात आले.

माणसाच्या मुलभूत गरजांपैकी शिक्षण ही एक मुलभूत गरज आहे. 21 व्या शतकात शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. कोरोना विषाणूचा सर्वात जास्त परिणाम याच शिक्षण क्षेत्रावर झालेला पहायला मिळतो. त्या अनुषंगाने राज्य शासनाकडून शाळा बंद पण शिक्षण सुरू अशी मोहीम आखण्यात आली. खासगी शाळेतील विद्यार्थी काही प्रमाणात या शिक्षण पद्धतीचा अवलंब करताना दिसून असून जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी मात्र ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे दिसून आले आहे.

शिक्षणाची पद्धत बदलणार का ?

भारताने मनुष्य बळ विकास मंत्री रमेश पोखरियाल निशंक यांनी बीबीसीसोबत चर्चा केली. मुलांना शाळेत जाता येत नाही- तोपर्यंत ऑनलाईन वर्गांच्या माध्यमातून शाळा मुलांच्या दारापर्यंत येणार असल्याचा दावा त्यांनी केलाय.

कोरोना व्हायरसमुळे भारतात शाळा कधी आणि कशा सुरू होणार?

कोरोना व्हायरसचा प्रसार रोखण्यासाठी लॉकडाऊन लावण्यात आल्यानंतर शाळा-कॉलेजेसही बंद झाली. भारतातले प्राथमिक शिक्षणापासून ते विद्यापीठ पातळीपर्यंत 33 कोटी पेक्षा जास्त विद्यार्थी सध्या घरी बसून आहेत.

1] जगभरातल्या 70% विद्यार्थ्यांवर या जागतिक साथीचा आणि लॉकडाऊनचा परिणाम झालेला आहे.

2] पण आता लॉकडाऊनचे निर्बंध हळुहळु शिथील करण्यात येतायेत आणि ऑगस्टनंतर शाळा सुरू करण्याची तयारी करण्यात येतेय.

3] मनुष्यबळ विकास मंत्रालय, गृह खातं आणि आरोग्य खात्यासोबत मिळून यासाठीची मार्गदर्शक तत्त्वं तयार करण्यात येत असल्याचं मनुष्यबळ विकास मंत्री रमेश पोखरियाल निशंक यांनी म्हटलंय.

4] या बदललेल्या परिस्थितीत शाळा सुरू झाल्यानंतर शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या पद्धतीही बदलतील शिक्षणासोबतच सोशल डिस्टंसिंगही महत्त्वाचं असेल.

ऑनलाईन शिक्षण उपक्रम चांगला, मात्र ग्रामीण भागातील विद्यार्थी वंचित राहतील व विवेक पंडित :-

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या लॉकडाऊनच्या काळात ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून विवेक पंडित यांनी राज्यसरकारला पत्र लिहून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सरकारचा ऑनलाईन शिक्षणाचा उपक्रम सद्याच्या परिस्थितीत अतिशय योग्य असला, तरी त्यांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने न झाल्यास ग्रामीण, आदिवासी भागातील गरिबांची मुले शिक्षणापासून वंचित राहण्याची भीती विवेक पंडित यांनी व्यक्त केली. याबाबत त्यांनी शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांच्यासह प्रशासकीय अधिकाऱ्यांना स्वतंत्र पत्र ~~पाठवले~~ पाठवले आहे. या पत्राद्वारे त्यांनी राज्यात ऑनलाईन शिक्षण पद्धती अंमलात ~~आण~~ आणण्याआधी ग्रामीण व दुर्गम भागात तात्काळ करावयाची कार्यवाही, उपाययोजनांबाबत शासनाला शिफारशी देखील केल्या आहेत.

विवेक पंडित म्हणाले, "कोरोनाचा प्रादुर्भाव विद्यार्थ्यांना होऊ नये यासाठी राज्यातील शाळा आणि इतर शैक्षणिक संस्था मार्च महिन्यापासून बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, आता वर्ष 2020-21 या शैक्षणिक वर्षाचे मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी राज्य शासन ऑन-लाईन शिक्षणाची पद्धत सुरू करण्याच्या तयारीत आहे. सद्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात व कोरोना संकटाशी लढण्यासाठी घेतलेला हा ऑन-लाईन शिक्षण पद्धतीचा उपक्रम अतिशय स्तुत्य आणि कौतुकास पात्र आहे. मात्र सद्या परिस्थितीचा विचार करता टाळेबंदीमुळे गरिबांच्या हाताला काम नाही. आर्थिक चक्र

पूर्णपणे शांबलेले आहे. त्यामुळे अनेक कुटुंबे वीज बील भरू न शकल्याने त्यांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे.

राज्यातील 51 हजार 677 [48.65 %] शाळांमध्ये संगणक व इंटरनेटची सुविधाच नाही":-

विवेक पंडित म्हणाले महाराष्ट्रात आजच्या घडीला 1 लाख 6 हजार 327 प्राथमिक शाळा आहेत. 27 हजार 446 माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा आहेत. या ~~शाळां~~ शाळांमधून 2 कोटी 24 लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ~~या शाळांमधून 2 कोटी~~ त्यापैकी ग्रामीण व दुर्गम भागातील शाळांची संख्या 99 हजार 144 (74.16%) इतकी मोठी आहे. यातील आज जेव्हा कोरोना व्हायरसने आपण गुहीत धरलेले जग हादवून टाकले आहे आणि व्यापक प्रमाणावर मानसिक चिंता आणि अस्तित्वाची अनिश्चितता निर्माण केली आहे. अशा महत्त्वपूर्ण टप्प्यावर आपण शिक्षक व शिक्षणतज्ज्ञ म्हणून अत्यंत वाईट पद्धतीने अयशस्वी ठरलो आहोत, याविषयी मला खेद वाटेल. या गोंधळलेल्या क्षणी शिक्षणाचा उद्देश आणि उद्देश याविषयी पुनर्विचार करण्याऐवजी आपण केवळ ऑनलाइन अध्यापनासाठी योग्य ॲप्स कशी वापरायची जेणेकरून सामाजिक अंतराच्या अडथळ्यावर विजय मिळवता येईल. अशा तांत्रिक प्रश्नांना महत्त्व देताना दिसत आहोत. हे काय करणे म्हणजे कृत्रिमरित्या सर्वसामान्य परिस्थिती असल्यासारखे दाखवणे आणि आपल्या आयुष्यात मुलभूतपणे काहीही बदलले नाही असा आव आणण्यासारखे आहे. म्हणून

आपण तीच पाठ्यपुस्तके, तोच अभ्यासक्रम, तीच श्रेणीपद्धती, त्याच परीक्षा, आणि त्याच अभ्यासक्रमांत या तंत्रज्ञानाच्या जोरावर पुढे जाऊ शकतो असे आपल्याला वाटत आहे.

या ऑनलाइन वर्गाची मागणी जसजशी वाढत जाईल, तसतसा ऑनलाइन शिक्षणीच्या व्यवसायात शुल्क गुंतलेल्या कंपन्यांचे प्रश्न वाढू लागले एक असा दबाव येईल की, सुरुवातीला मोफत ऑनलाइन शिक्षण देणाऱ्या कंपन्या त्यांच्या सेवांसाठी चांगला दाम मोजून घेऊ लागतील. ऑनलाइन शिक्षण देणाऱ्या या कंपन्यांच्या अवाचव्या सेवा शुल्कामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या पालकांना हे ऑनलाइन शिक्षण परवडणार नाही. त्यामुळे शाळा स्तरावर तंत्रज्ञानावर अति अवलंबित्व आणि वर्गातील सत्रांमध्ये घट, विशेषत: शहरी भागांत, या गोष्टीमुळे शालेय शिक्षण दुर्मीळ होईल आणि त्यामुळे अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलांना तर प्राथमिक शिक्षण घेण्यातही अडथळे निर्माण होतील. इंटरनेटच्या कमी जोड्या [२०१९ मध्ये ३६%] आणि वापरकर्त्यांमधील सामाजिक दरी यांमुळेही शालेय शिक्षणाची देणावस्था होईल.

कोरोना आणि ऑनलाईन अध्यापनाची विवेकशून्यता :-

आज जेव्हा कोरोना व्हायरसने आपण गृहीत धरलेले जग ठप्प करून टाकले आहे आणि व्यापक प्रमाणावर मानसिक चिंता आणि अस्तित्वाची अनिश्चितता निर्माण केली आहे, अशा महत्त्वपूर्ण टप्प्यावर आपण शिक्षक व शिक्षणतज्ज्ञ म्हणून अत्यंत वाईट पद्धतीने अयशस्वी ठरलो आहोत, याविषयी मला खेद वाटते. या गोंधळलेल्या क्षणी शिक्षणाचा अर्थ आणि

उद्देश याविषयी पुनर्विचार करण्याचेदेखील आपण केवल ऑनलाइन अध्यापनासाठी योग्य ॲप्स कशी वापरायची नेणेकरून 'सामाजिक अंतराच्या' अडथळ्यावर विजय मिळवता येईल अशा तांत्रिक प्रश्नांना महत्त्व देताना दिसत आहोत. हे ~~काम~~ करणे म्हणजे कृत्रिमरीत्या सर्वसामान्य परिस्थिती असल्यासारखे दाखवणे आणि आपल्या आयुष्यात मूलभूतपणे काहीही बदलले नाही असा आव आणण्यासारखे आहे. म्हणूनच आपण तीच पाठ्यपुस्तके, तोच अभ्यासक्रम, तीच स्वगते, त्याच परीक्षा आणि त्याच असाइनमेंट या बरोबर यावेळी ऑनलाईन अध्यापन या अद्भुत तंत्रज्ञानाच्या जोरावर पुढे जाऊ शकतो असे आपल्याला वाटत आहे.

कोरोना संबंधित मानसिक शोषणाची जाणीव करून द्या. व्यक्तीला मृत्यू ही आता सांख्यिकी संकल्पना वाटत नाही. तो खरा आहे. त्याचे अस्तित्व इथे आहे. हा विषाणू कोणत्याही क्षणी आपल्या बंदिस्त समुदायात शिरू शकतो आणि आपल्याला आपणच खोकतोय आणि श्वास घ्यायला त्रास होतोय, अशा परिस्थितीत सापडू शकतो. पण त्याचवेळी एक महाविद्यालयीन विद्यार्थिनी लॅपटॉपवर त्याचे समाजशास्त्राचे प्राध्यापक 'स्त्रीबॉल नमुना पद्धती' आणि सामाजिक संशोधनाची 'तंत्रे' शिकवताना आढळतात. हे विवेकशून्य नाही का? किंवा, मध्यमवर्गीय कुटुंबातील बारा वर्षाच्या एका मुलाला टाळेबंदीमुळे एका लहान खोलीत अस्वस्थ आणि गुदमरल्यासारखे वाटत असूनही 'ऑनलाईन अध्यापन' पुढे जाणे आवश्यक असल्यामुळे त्याला कुटुंबात उपलब्ध असलेला एकमेव स्मार्टफोन वडिलांकडून उधार द्यावा लागतो. त्यावर त्याचे गणिताचे शिक्षक त्यांना जीवन विरोधी 'टक्केवारी' किंवा 'नफा-तोटा' ही प्रकरणे पूर्ण करताना दिसतात, हे विवेकशून्य तर आहेच पण असंवेदनशील आहे. ही एक प्रकारची हिंसा आहे.

निष्कर्ष

कोरोनाच्या कालात शिक्षणावर कसा परिणाम झाला हे आपल्याला सगळीकडे पहायला मिळते. त्याचप्रमाणे ऑनलाइन शिक्षण ज्या मुलांकडे मोबाईल नाही त्या मुलांना ऑनलाइन शिक्षण कसे सेपणार याचा विचार शिक्षक मंडळांने केला पाहिजे. शिक्षण क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर दूरगामी परिणाम झालेल्या आपल्याला पहायला मिनतो. त्याचप्रमाणे कोरोना व्हायरसच्या जागतिक साथीमध्ये एकमेकांच्या संपर्कात राहण्यासठी whatsAPP ची कशी मदत झाली हे आपल्याला पहायला मिळते. कोरोनामुळे शिक्षणात सावळा गोंधळ. विद्यार्थी अध्यापनापासून दूर झाल्याचे आपल्याला आढळून येते. कोरोनामुळे भारतात शिक्षणाची पद्धत कशी व कशा प्रकारे बदलणार हे आपल्याला आढळून येते.

ऋणनिर्देशक

1] हा प्रकल्प तयार करत असताना मला Google या APP ची मोठ्या प्रमाणात मदत झाली.

2] तसेच हा प्रकल्प तयार करत असताना मी मित्र-मैत्रिणी यांच्याशी मोबाईल वरून संपर्क साधून त्यांची सुद्धा हा प्रकल्प तयार करत असताना मदत झाली.

3] हा प्रकल्पाचा विषय Prof. B.M. Chaugule यांना सद्या चालेल्या परिस्थितीवर दिल्या कारणाने यासंबंधीत माहित असल्याने हा प्रकल्प तयार करताना फार मोठ्या प्रमाणावर त्रास झाला नाही.

4] हा प्रकल्पात मी कोविड-19 चा शिक्षणावर कसा परिणाम झाला आहे. याची माहिती या प्रकल्पात मी सविस्तरित्या मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

अशा प्रकारे मी माझ्या मित्र-मैत्रिणींची त्याच प्रमाणे शिक्षकांची अत्यंत ऋणी आहे.